श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक

श्री साईनाथ ग्रंथालय
श्री साईबाबा संस्थान, शिर्डी.
69



तुझा घोडा ना! तो पहा तिथे आहे!

मार्च १९८२] [किंमत एक रुपया

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥ 70

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक


: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )


**श्रीसाई वाक्सुधा**


वर्ष ६० वे )    किंमत १ रुपया    ( अंक १२

मार्च १९८२

: कार्यालय :

" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.

दूरध्वनी : ४४३३६१

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



## श्रीसाई वाक्सुधा

ज्यांचे क्षणैक देखिल्या वदन ।
होय अनंत जन्म दुःख दलन ।
ते परमानंद जनन स्थान ।
धन्य श्रीवदन साईचें ॥ १ ॥

ज्यांचे झालिया कृपावलोकन ।
तात्काळ कर्मबंध विमोचन ।
स्वानंदपुष्टी निज भक्तजन ।
न लागतां क्षण लाधती ॥ २ ॥

ज्यांचिया कृपादृष्टी पुढे ।
कर्माकर्मांचे फिरे बिरडें ।
यत्कृपा सूर्यांचिया उजियेडें ।
भव खद्योत दडे निस्तेज ॥ ३ ॥

जगाची पापें भागिरथी धूते ।
तेणें ती स्वयें मलयुक्त होते ।
सांचला निजमल निर सावयातें ।
साधूंचे इच्छिते चरणरज ॥ ४ ॥

कधीं साधूंचे पाय लागती ।
कधीं मजमाजी स्नानार्थ येती ।
त्यावीण निजपापाची निर्गती ।
नव्हे, हें निश्चिती जाणेती ॥ ५ ॥

—श्रीसाई सच्चरित अध्याय ४७ वा.

जीवनातील सर्व प्रकारच्या इच्छापूर्तीचे साधन म्हणून गायत्री मंत्राचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. हा गायत्री मंत्र असा—

## गायत्री मंत्र

**ॐ भूर्भुवः स्वः । तत्सवितुर्वरेण्यं**
**भर्गो देवस्य धीमहि,**
**योनः प्रचोदयात् ॥**

जो सूर्य आमच्या बुद्धीला प्रेरणा देतो त्याच्या सर्व श्रेष्ठ तेजाची आम्ही उपासना करतो.

गायत्री मंत्रात चोवीस अक्षरे असल्याने जितकी अक्षरे तितके लाख जप केल्यानंतर त्या मंत्राची सिद्धी मिळते म्हणून गायत्री पुरश्चरण चोवीस लाखाचे सांगितलेले आहे.

# अनुक्रमणिका मार्च १९८२


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय | — मानवतावादी साईबाबा |
| २) | संत श्री भायजी महाराज | — श्री. दिलीप लांडे |
| ३) | राममारुती महाराज व पट्टेकर महाराज | — श्री. गजानन गुरुजी क्षेमकल्याणी |
| ४) | श्री दत्तदास दादामहाराज माडीये | — श्री जाधव मास्तर |
| ५) | बाबा संत नव्हते, भगवान होते | — प्रा. ए. पी. त्रिपाठी |
| ६) | श्रीकृष्ण सरस्वतीमहाराज | — श्री बाळासाहेब नाडकर्णी |
| ७) | श्रीबाबांच्या कृपेने फर्स्ट क्लास | — श्री. किशोर सूर्यवंशी |
| ८) | श्रीसाईलीला लेखक-कवींचे आठवे संमेलन | — साईनंद |
| ९) | संतश्रेष्ठ श्री काकामहाराज | — श्री मधुसूदन करंबेळकर |
| १०) | साईबाबा हेच डॉक्टर | — सौ. प्रतिभा शर्मा |
| ११) | साईपरिवार वृत्तविशेष | — |
| १२) | शिरडी वृत्त | — डिसेंबर १९८१ |
| १३) | आवो साई | — सौ. शांता सरोदे |
| १४) | शिरडी नगरी | — सौ. कमल सांडभोर |
| १५) | देवा जिंकले प्राणमोले | — श्री. श्रीराम आठवले |
| १६) | साईदर्शन | — श्री. नारायण तांबे |
| १७) | श्रीसाई चिंतन | — सौ. विजया देसाई |
| १८) | आठविता रुप साईचे | — श्री. यशवंत चव्हाण |
| १९) | प्रभुसाईनाथा घे धाव आता | — कु. यमुना माळवदे |
| २०) | शिरडी दर्शन घेऊया | — श्री. ग. शां. बडगुजर |
| २१) | भूपाळी | — श्रीमती रुक्मिणी बेंद्रे |
| २२) | सर्व साक्षी साई | — सौ. रश्मी कोरे |
| २३) | अभंग | — श्री. शिवाजी मोरे |
| २४) | घोषणा | — |

# मानवतावादी श्रीसाईबाबा

स. न. वि. वि.




जवळ जवळ ६४ वर्षे झाली त्या गोष्टीला. साईबाबांनी आपला पार्थिव देह १९१८ साली ठेवला. त्यावेळी त्यांना ओळखणाऱ्यांची संख्या वा त्यांना आपले गुरु मानणाऱ्यांची संख्या ही कितीशी होती हे आज जरी निश्चितपणे सांगता येत नसले तरी आज अखिल भारतात त्यांच्या नामाचा जो घोष ऐकू येत आहे; त्यावरून या महापुरुषाचे मोठेपणा किती आहे, हे कळून येईल.

त्यांचे हे मोठेपण महाराष्ट्राला काही नवीन नाही. ज्या महाराष्ट्राच्या कुशीतून ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम, एकनाथ, मुक्ताबाई, चांगदेव, नामदेव, चोखामेळा, सावतामाळी आदि महान संत निर्माण झाले, आणि ज्यांच्या कृतिवचनाने सारा भारत देश परकीयांच्या संकटातून आर्थिक, सामाजिक, राजकीय व धार्मिक बाबतीत सही सलामत बंधमुक्त होऊ शकला. त्याच महाराष्ट्रातील नगर जिल्ह्यातील एका चार झोपड्या असलेल्या बाजूच्या खेडेगावात श्रीसाईंनी आपले आयुष्य घालविले आणि त्या चार झोपड्याच्या गावाला महान तीर्थस्थान बनविले. याला कारण त्यांची शिकवण.

साईबाबा स्वतःला आपण कोणी महान आहोत, मोठे आहोत असे कधीही समजत नव्हते. स्वतःला योगविद्या अवगत असूनही तिचा त्यांनी बुवाबाजीकडे कधीही उपयोग केला नाही. ही गोष्ट त्यांच्याविषयींच्या ज्या काही आख्यायिका लोकात प्रसृत आहेत, त्यावरून सहज सिद्ध होईल.

साईबाबांनी आपल्या भक्तांचा कधीही दुरुपयोग करून घेतला नाही. भक्तांच्या भावनांचे स्वरूप आकलन करून घेऊन त्यांनी निंदकांना वा वंदकांना सारखेच लेखीले. मनी संशय असलेल्या व कुत्सित बुद्धीने आलेल्या लोकांच्या मर्मावर हात ठेवून त्यांनी त्यांचे निराकरण करून परमेश्वराच्या अस्तित्वाविषयीचा प्रत्यय आणून दिला.

साईबाबा अगदी साधे रहात. गावात भिक्षा मागत; तीन दगडांच्या चुलीवर ती शिजवत आणि उशाला गुरूने दिलेली वीट घेऊन झोपत; डोक्याला फडका बांधत अशी राहणी असूनही त्यांनी भक्तांकडून कधी कुठल्याही गोष्टींविषयी अभिलाषा बाळगली नाही. एकदा त्यांना शिरडी गावातील दिवे लावण्यासाठी तेल दिले नव्हते. पण तरीही त्यांनी त्याला शाप दिला नाही. केलेच तर कुणाचेही चांगले करावे, वाईट करू नये ही त्यांची वृत्ती असल्यामुळे त्यांनी हयात असेपर्यंत आणि हयातीनंतरही सर्व भाविकांचे कल्याणच केले.

आज शिरडीला जाणाऱ्या लोकांची रीघ पाहिली, म्हणजे हा प्रश्न चटकन डोळ्यापुढे उभा राहतो, शिरडी हे कुठल्या धर्माचे भक्तिस्थान आहे? पण याचे उत्तर तेथील तो बहुधर्मीय मेळावा पाहून आपोआपच मिळते. हिंदू, मुसलमान, पार्शी ख्रिश्चन, जैन आदि सर्व धर्माचे लोक तेथे मोठ्या भक्तिभावाने जमतात. घंटेच्या निनादात परमेश्वराच्या नामघोषात प्रार्थनेच्या धीर गंभीर आवाजात एवढीशी चिमुकली शिरडी काही क्षण का होईना आपसातील हेवेदावे, मतामतांचा फरक, धार्मिक सहिष्णुता मिटवू पहाते. मानवतेला भक्तीच्या भावनेनं जाग आणू पहाते. याला कारण कोण? लोकांची साईबाबांवरील श्रद्धा की साईबाबांचे महाबल?

मानवजात तेवढी एक. मानवामानवांमध्ये या उभ्या केलेल्या धर्माच्या भिंती, पंथाच्या खोल्या, रीतिरिवाजांचे खांब आणि नीतिनियमांच्या खिडक्या ह्या झाल्या तरी त्या मानव–निर्मित आहेत. मानवाने या साऱ्या गोष्टी आपले जीवन सुखावह होण्यासाठी अनुभवाने, ज्ञानाने, चिंतनाने योजिल्या आणि त्या मूर्त रूपात आणल्या. या सर्वांचा हेतु सौख्य, आनंद हा होता.

पण मानवातील संघर्षाने ह्या मूलभूत गोष्टींना विकृत रूप आणले आणि त्याचे पर्यवसान दुःखात झाले.

आजही भिन्न भिन्न धर्मातील तत्वज्ञ, शास्त्रज्ञ आणि विद्वान मंडळी मानवाला मानवतेकडे नेण्याचा प्रयत्न आपापल्या परीने करीत आहेत.

धार्मिक जागृतीचे लोण इसवी सनापूर्वी २००० वर्षापासून ते आजतागायत भारतामध्ये चालू आहे. मानवतेची शिकवण या ना त्या नात्याने हे लोक देत आले आहेत. विसाव्या शतकात याचा वारसा हक्क श्रीसाईबाबांना मिळाला असावा असे आमचे अल्पसे मत आहे त्या शिवाय का आजच्या या बौद्धिक संघर्षाच्या युगातही मानवतेच्या महान शिकवणुकीची वाटचाल साईबाबांची शिरडी आजही करण्याची प्रयत्न करीत आहे!

▲

# थोर संतपुरुष श्री भायजी महाराज

-श्री. दिलीप शंकरराव लांडे
मु. पो. तऱ्हाळा ता. मंगरुळनाथ
जि. अकोला ( विदर्भ )



● महाराष्ट्र म्हणजे संतांचे माहेर घर. अनादी कालापासून या भूमीत थोर संत-महात्मे अवतीर्ण झालेत व त्या संत महात्म्यांनी सामान्यजनास या संसाररुपी समुद्रातून तरुन जाण्यासाठी ईश्वरभक्तीचा सुलभ व सोपा मार्ग दाखविला. त्या महान संत मालिकेतील एक महान संत होत, विदर्भातील तऱ्हाळा येथील श्री. भायजी महाराज.

श्री भायजी महाराज हे संतरत्न अकोला जिल्ह्यातील मंगरुळनाथ तालुक्यात 'तऱ्हाळा' या ग्रामी तिडके घराण्यात तसेच यजुर्वेदी ब्राह्मण कुळात जन्माला आले. ( त्यांची जन्मतारीख कुणास नक्की माहीत नाही ) त्यांचे वडिलांचे नाव श्री. बाळकृष्ण तिडके व आईचे नाव सौ. कासाबाई. दोघेही ईश्वरभक्त, बाळकृष्णपंत सूर्यउपा-

सक होते. ते नित्यनेमाने सूर्यउपासना करीत. महाराजांचे जन्माअगोदर त्यांना 'लहानूबाई' नावाची मुलगी झाली. त्यानंतर काही वर्षे त्यांना मूलबाळ झाले नाही. पुत्र नसल्याची खंत दोघाही उभयतांच्या मनाला वाटत असे. त्यासाठी त्यांनी सूर्य-देवतेची उपासना केली. त्या उपासनेचे फळ लवकरच त्यांना मिळाले. त्यांना सूर्या-सारखा दितीमान पुत्र प्राप्त झाला तेच हे भायजी महाराज होत.

महाराजांची मूर्ती लहानपणापासूनच तेजस्वी व बाणेदार होती. मुखावर विल-क्षण तेज. बाळकृष्णपंतांनी महाराजांचे नाव 'भायजी' असे ठेवले. महाराजांनी लहानपणापासूनच आपल्या बालक्रिडांनी सर्वांची मने जिंकून घेतली. महाराजांची ओढ बालपणापासूनच ईश्वराकडे होती. ते लहानपणी जे खेळ खेळत ते असे–आठ दहा मुले जमा करावी छुटुपुटू किर्तन होई. भजनांची नक्कल होई. मुले मुले नामाचा गजर करीत गावभर हिंडत. भूतदयेचा उगम त्यांचे अंतःकरणात बालपणापासूनच होता. प्राणीमात्रांना पाणी पाजावे, वानरांना आंबे द्यावेत, पक्षांना दाणे घालावेत इत्यादी गोष्टी कुणी न सांगता स्वतःच करीत. अशा आनंदी वातावरणात एक दुःखद प्रसंग घडला. महाराजांचे वडिलांचे देहावसान झाले. त्यावेळी महाराज फक्त सात वर्षांचे होते. त्यामुळे सर्व कुटुंबाचा भार महाराजांचे आईवर व आजीवर येऊन पडला

वयाच्या ९ व्या वर्षी महाराजांची मुंज झाली, महाराजांचे शिक्षण पंतोजी जवळ झाले. महाराज जन्मताच बुद्धीवान असल्यामुळे लवकरच ते पारंगत झाले. महाराजांचे लक्ष खेळण्याकडे जास्त असे. कामटीचे चाप करावेत, काठ्यांचे बाण बनवावेत व निशाण मारीत फिरावे. कधी आंबे पाडावे व ते वाटून द्यावे हेच त्यांचे उद्योग. पूर्वी लहानपणीच लग्न करत असत. त्यानुसार महाराजांसाठी वधू शोधण्यात आली वधु होती 'दानापूर' या गावची व तिचे नाव होते 'राधाबाई' महाराजांचा विवाह फारच धुमधडाक्याने साजरा झाला वरात तऱ्हाळयाला आल्यानंतर महाराजांचे आजीने खुप अन्नदान केले. हजारो लोक जेऊन तृप्त झाले. राधाबाई व महाराजांचे जोडपे म्हणजे जणू काही 'सत्यवान–सावित्री' किंवा 'नल-दयमंती' विवाह मोठ्या आनंदात पार पडला. महाराज वयात आल्यानंतर अतिशय रुपवान दिसत. गोरा रंग, मजबूत शरीरयष्टी, सुंदर नाक, भव्य कपाळ, पाणीदार नेत्र पहाणारा थोडावेळ दंगच व्हायचा.

महाराजांना घोड्यावर बसून बंदुकीने शिकार करण्याची खुप हौस. त्यांच्या जवळ बंदुक व घोडा सदैव असायचा. घोड्यांवर बसून शिकारीस जावे व अचूक निशाण बांधून वाघ, रानडुकरे अशा क्रूर प्राण्यांची शिकार करावी व तीही समोरा

समोर जाऊन. महाराजांना प्रथम एक पुत्र झाला. त्याचे नाव 'बाळकृष्ण' असे ठेवले. नंतर महाराजांना दुसऱ्या वर्षी पुन्हा पुत्र झाला त्याचे नाव 'विठ्ठल' असे ठेवले. नंतर तिसराही पुत्र झाला त्याचे नाव 'जयकृष्ण' असे ठेवले. महाराजांचे पुत्र महाराजांसारखे बुद्धीमान व धार्मिक प्रवृत्तीचे महाराजांचा वडील पुत्र बाळकृष्ण आजारी पणात निवर्तला. त्यामुळे महाराजांचे मनाला खुपच दुःख झाले व त्यांचे मनावर खुपच परिणाम झाला.

मोठमोठ्या संताचा इतिहास पाहिला तर असे दिसून येईल की गुरुवाचून कोणीही उपदेश केला नाही. प्रत्येक संतांना गुरु होते. तसेच भायाजी महाराजांचेही गुरु होते. बार्शी टाकळी येथील ह. भ. प. सद्गुरु श्री गोविंद महाराज. गोविंद-महाराज म्हणजे महान कृष्णभक्त. त्यांच्या किर्तनात भगवान श्रीकृष्ण तल्लीन होऊन नाचत असे. त्यांच्या वर शेगावच्या श्री. गजानन महाराजांची कृपा होती. त्यांना प्रत्यक्ष 'भक्तवत्सल पांडुरंगाने दर्शन दिले होते. श्री गोविंदमहाराज तऱ्हाळयाला नेहमीच येत असत. महाराजांचे आजीने महाराजांना गोविंद बुवांना जवळ आणले व उपदेश करण्यास सांगितले. बुवांनी ओळखले की हा सामान्य माणूस नव्हे हा ईश्वरी अवतार आहे. गोविंदमहाराजांनी त्यांना गुरुउपदेश केला व शिकारीसारखे नाद सोडून देण्यास सांगितले व साधे व सरळ जीवन जगण्यास सांगितले. महा-राजांनी गुरु आज्ञा मानून सर्व सोडण्याचे कबूल केले. महाराजांना आशिर्वाद देऊन गोविंदबुवा निघून गेले, व त्यानंतर महाराजांनी आपले सर्व लक्ष ईश्वरभक्तीकडे केंद्रित केले. महाराज म्हणजे रामभक्त. महाराजांनी तऱ्हाळा येथे यात्रा भरविण्याचे ठरविले. त्यानुसार त्यांनी यात्रा सुरू केली. यात्रेचे नाव ठेवले 'भरत रामचंद्र भेट' या कामी महाराजांना मदत केली महाराजांचे समकालीन संत फक्कीरजी महाराज. यात्रेचा दिवस ठरवला 'दत्तजयंती'.

या यात्रेचे वैशिष्ठ्य असे की, मोठमोठे (प्रचंड) रावण व कुंभकर्ण यांचे कामटीचे पुतळे तयार केले जातात, नंतर राम, लक्ष्मण, सीता, हनुमान, शत्रूघ्न, वसीष्ठमुनी ह्यांची सोंगे घेतात व तसेच एक बिभीषणाचा एक मातीचा पुतळा तयार केला जातो व सजवला जातो. सीता अशोक वनात ठेवतात. नंतर राम, लक्ष्मण, हनुमान प्रथम कुंभकर्णाला बाण मारून त्या पुतळ्याचे दहन करतात नंतर रावणाच्या पुतळ्याला सुद्धा राम, लक्ष्मण, हनुमान, हस्ते दहन केले जाते नंतर वाजत गाजत राम, लक्ष्मण, हनुमानसहित सीतेला घेऊन भरताकडे येतात तेथे भरत-रामचंद्र भेट होते व नंतर राम बिभीषणाला लंका प्रदान करतात व नंतर वसीष्ठमुनी रामचंद्राला राज्याभिषेक करतात व राम व सीता स्थानापन्न झाल्यावर हजारो लोक प्रभू रामचंद्र

व महाराजांचे नावाचा जयघोष करतात व प्रसाद वाटप होऊन तो नेत्रदिपक सोहळा संपतो. अगोदरच्या दिवशी अन्नदान होते व हजारो लोक जेवून संतुष्ट होतात ही यात्रा अद्यापही चालू आहे. दरवर्षी 'दत्तजयंतीला' हजारो लोक यात्रेत सामील होतात.

महाराजांनी ही यात्रा सुरू केली त्यावेळी प्रथम त्यांनी स्वतःच खर्च केला व स्वतःजवळील सर्व संपत्ती ह्या कामी खर्च केली. व ही संपत्ती खर्च झाल्यावर त्यांनी कर्ज काढून हा उत्सव सुरू ठेवला. नंतर महाराज गावोगाव हिंडून वर्गणी जमवून यात्रा भरवीत. यात्रेला गुरु गोविंद महाराज व अनेक संत महात्मे येत असत. महाराज सर्वांची व्यवस्था चोख ठेवत असत. संत महात्म्यांच्या सेवेत जराही कमतरता पडू देत नसत. महाराजांना अनेक संतमहात्म्यांचा आशिर्वाद लाभला होता. त्यात प्रामुख्याने अवलीया महाराज, काळामाथा, खरे महाराज अमरावती, गजानन महाराज, शेगाव ह्यांचा समावेश आहे.

महाराज रामचरणी इतके लीन झाले की, त्यांची काळजी स्वतः प्रभू रामचंद्र घेत असत. असाच एक प्रसंग. एका वर्षी खूपच दुष्काळ पडला. दुष्काळ पडल्याने अन्नधान्याची खूपच अडचण. कोणाचीही खाण्याची सोय नव्हती. अशात यात्रा आली. यात्रेसाठी कोण वर्गणी देणार ? महाराज नाराज झाले. विचारात पडले. काय करावे ? ते बार्शी टाकळीकडे जाण्यास निघाले. रस्त्यात साक्षात प्रभु रामचंद्रांनी महाराजांना दर्शन देऊन त्यांना सुवर्णमुद्रांची थैली दिली, व उत्सव साजरा करण्यास सांगितले. महाराज परत आले व त्यांनी मोठ्या उत्साहाने दुष्काळी काळात दुरून दुरून धान्य मागवून यात्रा उत्सव साजरा केला, व हजारो लोकांना जेवू घातले. पंक्तीतील लोक जेवताना पाहून महाराजांना खूपच आनंद व्हायचा. जनामध्ये त्यांना प्रभू रामचंद्र दिसत असे. त्यांच्या अन्नदानात जनता-जनार्दनाची सेवा हाच भाव होता.

महाराज यात्रा सुरू करून थांबले नाहीत तर तऱ्हाळयाजवळील पिंपळखुटा या ग्रामी त्यांनी 'राम-नवमी' ला 'राम-जन्म' उत्सव सुरू केला. तेथे सुद्धा ते अन्नदान करीत. एक प्रसंग असाच ( पिंपळखुटा येथील ).

बाबांनी राम-नवमी उत्सवा प्रित्यर्थ शिऱ्याचे जेवण देण्याचे ठरविले. स्वयंपाक झाला. जनसमुदाय खूपच असल्या कारणाने शिऱ्याची कमतरता पडली. आता काय करावे ? तूप संपले. वेळेवर इतके तूप जमविणे कठीण, महाराजांनी त्या वेळी जवळील 'मनकर्णी' नामक विहिरीतून दोन पिंपे पाणी भरून आणावयास सांगितले.

व त्यावर कोरडे कापड घालून त्यांची पूजा केली. प्रभू रामचंद्राचे ध्यान केले व लोकांना जयजयकार करण्यास सांगितले व कापड काढून घेतले. काय चमत्कार! त्या पाण्याचे तूप झाले होते व लगेच शिरा तयार करून वाटण्यात आला व लोक संतुष्ट झाले. नंतर महाराजांनी तूप विकत घेऊन 'मनकर्णे'ला परत केले. चमत्कार असा की तुपाचा जराही तरंग पाण्यावर आला नाही असे महाराजांचे अनेक चमत्कार सांगता येतील.

महाराजांनी प्रभू रामचंद्राची तनमनधनाने सेवा केली. येणाऱ्या अतिथींची मनोभावे सेवा केली.

महाराज अयोध्या, रामटेक येथे जाऊन भगवान रामचंद्राचे दर्शन घेऊन आले. तेथे त्यांनी बराच दानधर्म केला व तेथील वानरांना चणेफुटाणे खाऊ घातले. नंतर महाराज जवळपास सर्वच तीर्थक्षेत्री जाऊन आले. महाराजांच्या कृपेने अनेकांना पुत्रप्राप्ती झाली. महाराजांच्या कृपेने अनेकांचे कल्याण झाले. महाराज थकले होते तरी त्यांच्या कोणत्याही कामात भक्तांनी कमी पडू दिले नाही. महाराजांनी शेवटच्या क्षणापर्यंतही कुणाला दुखवले नाही. एक दिवस त्यांनी भक्तांना बोलावून "आपल्याला पिंपळखुटा येथील 'अडान व मडान' या नद्यांच्या संगमावर अग्नी द्यावा" असे सांगितले व त्यानंतर काही दिवसातच प्रभू रामचंद्राचे नामस्मरण करीत गुरुनामाचा जप करीत महाराजांनी शुक्रवार दि. १४ जुलै १९१६ साली आपली इहलोक यात्रा संपविली व तऱ्हाळावासी व सर्व भक्तांना पोरका करून हा महान संत निघून गेला. पिंपळखुटा या ग्रामी संगमावर तसेच तऱ्हाळा या ग्रामी महाराजांचे स्मारक बांधलेले आहे, व "भायजी महाराज संस्थानची" दिवसेन् दिवस प्रगती होत आहे. आजही महाराजांचे चमत्कार भक्तांना होतात. त्या महान संताच्या चरणी कोटी कोटी प्रणाम!

"श्री भायजी जन्मती देवकार्यी
सन्मार्गगामी जन ते कराया
भक्ती प्रसारास्तव संत आला
साष्टांग वंदू गुरू भायजीला"

श्रीसाईबाबा-श्रीराम-मारुती महाराज, कल्याण व संतश्री गजानन महाराज पट्टेकर, ठाणे ह्यांचे बद्दलची—

# दुर्मिळ माहिती

—पं. गजानन गुरुजी क्षेमकल्याणी
काव्यतीर्थ, संस्कृत विशारद
ध्रुवप्रसाद, गणेशटेक, नाशिक १०

● आम्ही ज्यांच्या कृपाछत्राखाली सुखाने वावरत आहोत त्या ठाणे येथील सुप्रसिद्ध संत प. पू. श्रीगजानन महाराज पट्टेकर ह्यांच्या जीवनात श्री साईबाबा व संत श्रीराम-मारुती महाराज ह्यांचा कसा उल्लेखनीय संबंध आला होता, त्याची मोठी रोचक हकीगत साईलीला अंकासाठी मुद्दाम लिहून पाठवत आहे.

प. पू. श्री संत गजानन महाराजांचे वडील कै. केशवराव पट्टेकर हे शहापूरला सन १९१७ साली, त्यावेळचे तेथील डेप्युटी कलेक्टर श्री. नानासाहेब चांदवडकर ह्यांचे हेड क्लार्क होते. प. पू. श्रीसंत गजानन महाराजांच्या तीर्थरुपाचा जन्म सोळा सोमवारच्या व्रताच्या नवसाने झाला होता. त्य.चे पहिल्या पासूनचे धार्मिक आचरण द ह्या कुटुंबातील लोकोपकारी मनोवृत्ति ह्यां बद्दल त्या परिसरात मोठा आदरभाव व्यक्त होत असे. पुढे श्री महाराजांचे वडील फर्स्टक्लास मॅजिस्ट्रेट झाले. तत्पूर्वी त्यांचे शहापूरला वास्तव्य होते. पूज्य श्री गजानन महाराजांचे काका श्री. आत्माराम बाळकृष्ण पट्टेकर हे त्यावेळी मराठी शाळेचे हेडमास्टर होते. त्यांना आप्पा मास्तर म्हणून ओळखत. एक निष्णात ज्योतिषी म्हणून त्यांचा मोठा लौकिक होता. त्यांचा फार आग्रह की—चि. गजाननची (प. पू. श्री महाराजांची) मुंज लवकर करून घ्यावी. कारण ते म्हणत, 'मी थोड्याच दिवसात जाणार आहे.' मुंज झाल्यावर ती. काकांना आपल्या पुतण्यास साधूच्या पायावर घालायचे होते.

भावाच्या निकडीवरून श्री महाराजांच्या तीर्थरूपानी आपला मोठा मुलगा दमा (श्री. दामोदरपंत) व दुसरा गजानन (प. पू. श्री गजानन महाराज) ह्या दोघांच्या मुंजी करून घेतल्यावर श्री. काकांनी शहापूरच्या गंगेवरील औदुंबराच्या (उंबराच्या) झाडाखाली बसलेल्या तीन साधुपुरुषांच्या पायावर श्री महाराजास

घातले. तेव्हा त्यापैकी एक साधु, श्री महाराजांचे काकास म्हणाला ' ह्या मुलास श्रीगुरु भेटीचा प्रसाद होईल. ' ह्यानंतर थोड्याच दिवसानी काका निवर्तले.

उंबराच्या झाडाखालील हे तीन साधु कोण होते? ह्याबद्दल श्री. नानासाहेब चांदवडकर ह्यांच्याजवळ प्रत्यक्ष श्री साईबाबा ह्यांच्या कडूनच खुलासा मिळाला. श्री साईबाबा म्हणाले,–' अरे! तुझ्या हेडक्लार्कचा मुलगा गजानन ह्यास मी शहापूरच्या गंगेवर उंबराच्या झाडाखाली भेटलो होतो. माझ्याबरोबर हुबळीचा सिद्धारूढ, कल्याणचा मारुति–राम मारुति पण होता. आता तू पण शहापूरच्या गंगेत स्नान कर आणि उंबराच्या झाडाखाली आमचे दर्शन घे. '

श्री नानासाहेब चांदवडकर शिर्डीहून परत आल्यावर लगेच प. पू. श्रीगजानन महाराजांच्या वडिलांकडे आले व मोठ्या विस्मयाने नि कौतुकाने श्री बाबांच्या शब्दात तेथील हकीगत सांगून आपल्याबरोबर आणलेले पेढे–प्रसाद त्यांना दिला. दुसऱ्या खेपेस श्री. नानासाहेब चांदवडकर, श्री. गोपाळराव तुंगारे, साईसच्चरित्र ग्रंथकर्ते (हेमाडपंत) श्री. दाभोलकर हे त्यावेळी रेव्हेन्यू कचेरीत होते. पुढे शहापूरला मामलेदार म्हणून आले. तलाठी जीवनभाई शुक्ल, श्री. राजाराम ठाकरे महालकरी, श्रीरामाचे पुजारी श्री. बंडू नाना, श्री. शंकरराव गोडबोले. श्री. शंकरराव तुंगारे, तसेच अंधेरीचे श्री. मोरोबा प्रधान, ही मंडळी दर्शनास गेली असता श्री साईबाबांनी श्री. चांदवडकर यांना विचारले,–' अरे तुझा गजानन ( पूज्य श्री गजानन महाराज ), मारुतीच्या देवळात किती वेळ असतो?' श्री. नानासाहेब वगैरे मंडळी शहापूरला परत आल्यावर पूज्य श्री महाराजांच्या वडिलांकडे आली व सारा प्रकार मोठ्या कौतुकाने सांगितला. श्री गजानन महाराजांस हाक मारून त्यांच्या हाती प्रसाद दिला.

श्री. दाभोलकरांनी आपला साईसच्चरित्र ग्रंथ लिहून पुरा केल्यावर (छापण्यापूर्वी) शहापूरच्या गंगेवर, औदुंबराच्या झाडाखाली त्याची पूजा केली. त्यावेळी प्रामुख्याने श्री. गोपाळराव तुंगारे मामलेदार, श्री. शंकरराव गोडबोले, श्री. दत्तोबा पत्की, श्री. शंकरराव तुंगारे, श्री. दगडू पाटील, श्री. विश्वासराव माने वगैरे मंडळी उपस्थित होती. श्रीराम मंदिराचे पुजारी श्री. बंडू नाना व श्री. विनायक भटजी ह्यांनी शास्त्रोक्त पूजा सांगितली. ह्याच उंबराच्या झाडाखाली अनगांव कवाडचे श्री. सखाराम महाराज बसत असत. संत श्री गाडगे महाराज कीर्तनापूर्वी येथे विश्रांती घेत असत.

पूर्वीच्या काळी सिंहस्थ अगर दुसऱ्या यात्रांना, नासिकला साधु सत्पुरुष व भाविक मंडळी, पायीच निघत असत. वाटेत त्यांचा एक दोन दिवस शहापूरला

घातले. तेव्हा त्यापैकी एक साधु, श्री महाराजांचे काकास म्हणाला ' ह्या मुलास श्रीगुरु भेटीचा प्रसाद होईल. ' ह्यानंतर थोड्याच दिवसानी काका निवर्तले.

उंबराच्या झाडाखालील हे तीन साधु कोण होते ? ह्याबद्दल श्री. नानासाहेब चांदवडकर ह्यांच्याजवळ प्रत्यक्ष श्री साईबाबा ह्यांच्या कडूनच खुलासा मिळाला. श्री साईबाबा म्हणाले,–' अरे ! तुझ्या हेडक्लार्कचा मुलगा गजानन ह्यास मी शहापूरच्या गंगेवर उंबराच्या झाडाखाली भेटलो होतो. माझ्याबरोबर हुबळीचा सिद्धारूढ, कल्याणचा मारुति–राम मारुति पण होता. आता तू पण शहापूरच्या गंगेत स्नान कर आणि उंबराच्या झाडाखाली आमचे दर्शन घे. '

श्री नानासाहेब चांदवडकर शिर्डीहून परत आल्यावर लगेच प. पू. श्रीगजानन महाराजांच्या वडिलांकडे आले व मोठ्या विस्मयाने नि कौतुकाने श्री बाबांच्या शब्दात तेथील हकीगत सांगून आपल्याबरोबर आणलेले पेढे–प्रसाद त्यांना दिला. दुसऱ्या खेपेस श्री. नानासाहेब चांदवडकर, श्री. गोपाळराव तुंगारे, साईसच्चरित्र ग्रंथकर्ते (हेमाडपंत) श्री. दाभोलकर हे त्यावेळी रेव्हेन्यू कचेरीत होते. पुढे शहापूरला मामलेदार म्हणून आले. तलाठी जीवनभाई शुक्ल, श्री. राजाराम ठाकरे महालकरी, श्रीरामाचे पुजारी श्री. बंडू नाना, श्री. शंकरराव गोडबोले. श्री. शंकरराव तुंगारे, तसेच अंधेरीचे श्री. मोरोबा प्रधान, ही मंडळी दर्शनास गेली असता श्री साईबाबांनी श्री. चांदवडकर यांना विचारले,–' अरे तुझा गजानन ( पूज्य श्री गजानन महाराज ), मारुतीच्या देवळात किती वेळ असतो ? ' श्री. नानासाहेब वगैरे मंडळी शहापूरला परत आल्यावर पूज्य श्री महाराजांच्या वडिलांकडे आली व सारा प्रकार मोठ्या कौतुकाने सांगितला. श्री गजानन महाराजांस हाक मारून त्यांच्या हाती प्रसाद दिला.

श्री. दाभोलकरांनी आपला साईसच्चरित्र ग्रंथ लिहून पुरा केल्यावर (छापण्यापूर्वी) शहापूरच्या गंगेवर, औदुंबराच्या झाडाखाली त्याची पूजा केली. त्यावेळी प्रामुख्याने श्री. गोपाळराव तुंगारे मामलेदार, श्री. शंकरराव गोडबोले, श्री. दत्तोबा पत्की, श्री. शंकरराव तुंगारे, श्री. दगडू पाटील, श्री. विश्वासराव माने वगैरे मंडळी उपस्थित होती. श्रीराम मंदिराचे पुजारी श्री. बंडू नाना व श्री. विनायक भटजी ह्यांनी शास्त्रोक्त पूजा सांगितली. ह्याच उंबराच्या झाडाखाली अनगांव कवाडचे श्री. सखाराम महाराज बसत असत. संत श्री गाडगे महाराज कीर्तनापूर्वी येथे विश्रांती घेत असत.

पूर्वीच्या काळी सिंहस्थ अगर दुसऱ्या यात्रांना, नासिकला साधु सत्पुरुष व भाविक मंडळी, पायीच निघत असत. वाटेत त्यांचा एक दोन दिवस शहापूरला

मारुति महाराज व त्यांच्याबरोबर येणाऱ्या अधिकारी अशा सत्पुरुषांकडून श्रीसाईबाबा, श्री सिद्धारुढ स्वामी आदि सत्पुरुषांच्या एकात्मतेच्या व प्रेम संबंधाच्या गोष्टी ऐकावयास मिळत व घरात त्याची भक्तीयुक्त चर्चा होई. अलीकडे २०–२५ वर्षांच्या प. पू. संत श्री गजानन महाराज पट्टेकर गुरुमाऊलीच्या चिरसहवासामुळे श्रीराम मारुति महाराज वगैरे संतांच्या कथांना घरात वारंवार उजाळा मिळतो. प. पू. श्री संत गजानन महाराजांबद्दल आमच्या कै. चुलत्यांना व घरातील आम्हा सर्व मंडळींना पूज्य श्रीराम मारुति महाराजांइतकाच आदर, प्रेम व भक्तिभाव वाटतो.

आमची अशी ठाम समजूत आहे की,–श्रीसाईबाबा, श्रीराम-मारुति महाराज हे एकमेकांपासून भिन्न नाहीत. तसेच प. पू. संत श्री गजानन महाराज आणि श्री साईबाबा व संत श्रीराम मारुति महाराज हे एकच आहेत. म्हणून आम्ही प. पू. सद्गुरुदेव संत श्री पट्टेकर महाराज ह्या थोर विभूतीच्या कृपा-प्रसादाने आम्हास धन्य मानतो.

☆

Two Great Novels on SAI BABA

**"A MISSION DIVINE !"** Rs. 45/-

**" मशिदीत प्रगटला परमेश्वर!"** Rs. 36/-

Which have captured the heart of Sai devotees –now in Hindi too ! Very Soon !

'प्रगटे मस्जिद में साईं भगवान !'


No V. P. P. Postage for English-Marathi 4·50 each

**PRASHANTI PRAKASHAN, 5 Vasant Apartments, 47 Kastur Park, Shimpoli Road, Borivali (W), Bombay 400 092.**

# एक अविस्मरणीय साईभक्त

# श्री दत्तदास दादामहाराज माडीये

—लेखक – **डी. के. जाधवमास्तर**
गुरुप्रसाद कलानगर, वांद्रे पूर्व, मुं. ५१.



श्री. **दादामहाराज**

आपल्या दैनंदिनी व्यवहारातहि त्या परमतत्वाशी सतत संपर्क साधणारे आणि प्रभूच्या लीलांचा जीवनात पावलोपावली, प्रत्यक्ष घडवून देणारे दत्तदास दादामहाराज माडियेसारखे साधुपुरुष म्हणजे या मायामय जीवनातील ज्ञानदीपच होते माझी श्रीसाईभक्ति ही दादामहाराजांच्या सहवासातच रुजली आणि आकाराला आली म्हणूनच मी त्यांना श्री साई प्रेमाचा प्रकाश दाखविणारे जीवनातील आद्य गुरु मानतो. या परिचयात मी त्यांच्या स्मृतीला आदराची ओंजळ वाहत आहे.

दादामहाराजांचे मूळनाव रामचंद्र माडीये असे होते. त्यांची माझी १९२६ साली मुंबईत भेट घडली. त्यावेळी मी जे जे स्कूल ऑफ आर्टमध्ये शिकत होतो. मला कलेची आणि कलाशिक्षणाची मूळापासून आवड होती. या कला प्रेमाला मी शास्त्रशुद्ध शिक्षणाचे पैलू पाडीत होतो. अशावेळी मजवर एकाएकी आपत्ती कोसळली. माझे वडील अचानक इहलोकाची यात्रा संपवून काळाच्या पडद्याआड झाले. साऱ्या घराचा भार माझ्या अपरिपक्व शिरावर अचानक येऊन पडला. अशा परिस्थितीत आर्थिक आधार शोधण्यासाठी चित्रकलेचे काम मिळविण्यासाठी, मी सर्वत्र वणवणत होतो. या विपत्काळी मला दादामहाराजांची छाया लाभली. एका मित्राने मला दादामहाराजांचा परिचय करवून दिला. दादामहाराज श्रीसाईबाबांचे परमभक्त होते. त्यांनी माझी विचारपूस केली. एके दिवशी सकाळी त्यांनी मला साईमठात बोलावून घेतले. एक कॅनव्हासचा बोर्ड समोर ठेवून त्यांनी श्रीदत्तमहाराजांचे चित्र माझ्याकडून चितारून घेतले ते पाहून ते प्रसन्न झाले. त्यानंतर श्रीसाईबाबांचे चित्र त्यांनी मला काढावयास सांगितले. अशी सुमारे ५० पेंटिंग्ज त्यांनी माझ्याकडून करवून घेतली त्यांच्याकडे काम करीत असताना ते रोज माझ्या खिशात २ रुपये टाकीत.

मी त्यांना पैसे घेण्यास नाखुषी दर्शविताच त्यानी मला साईबाबा कुणाची विनामूल्य सेवा घेत नसतात असे मला सांगितले. माझी चित्रे पुरी होताच ते ती कुणाला तरी देऊन टाकीत. माझी परिस्थिती त्यांना माहीत असल्याने ते मला अशा अप्रत्यक्ष रीतीने आर्थिक सहाय्य देत व त्याचबरोबर प्रभूच्या रूपदर्शनाकडे माझ्या मनाला वळवीत हा शिकविण्याचा न्याराच प्रकार होता.

एकदा श्रीदादामहाराजांनी मजकडून श्रीदत्तात्रेयाचे मोठे चित्र चित्तारून घ्यावयाचे ठरविले. ते चित्र रंगविताना मला श्रीदत्त महाराजांचा प्रत्यक्ष भास त्या चित्रातून होऊ लागला. श्रीदत्त माझ्यासमोर काहीतरी शब्द बोलत आहेत असे मला वाटू लागले. मी तसे श्रीदादा महाराजांना सांगितले. ते ऐकताच दादामहाराज म्हणाले, 'आता ब्रश बाजूला ठेव' जणू भगवंताचे रुपचित्रण पुरे झाले होते



श्री. दादामहाराजांचा साईदरबार, कुडाळ

दादामहाराज कोकणी बोलीत मला म्हणाले, 'अरे, तो साहेब तुका नेऊक येतोलो.' मी काम आवरून घरी गेलो, व विचारात मग्न झालो. रात्री झोपेत मला एकसारखा श्रीदत्तगुरुंचा भास होत होतां. दुसरे दिवशी दादामहाराजांचे कोकणी बोल खरे झाल्याचे प्रत्यय आला. एका इटालियनची गाडी माझ्या दरवाजात येऊन उभी राहिली. त्या इटालियन गृहस्थाचे नाव लोबो ऑट्रीस असे होते. माझ्या एका मित्राचे ओळखपत्र घेऊन तो चित्रांच्या कामासाठी मजकडे आला होता. दादामहाराजांचे शब्द खरे झाले. त्या साहेबाने मला आपल्या स्टुडिओत गाडीमधून नेले. त्याने मुंबईतील चर्च मधल्या मूर्तीचे रंगकाम हाती घेतले होते. अनेक चित्रकारांची त्याने चाचणी घेतली होती. परंतु त्यांची कामे त्याच्या पसंतीस नसल्याने तो मजकडे आला होता. माझ्याकडून त्याने अनेक मूर्तीची कामे करून घेतली. मी प्रथम हे काम हाती घेताना फारच भयशंकित झालो होतो. हे कसोटीचे काम माझ्या हातून होईल की नाही याबद्दल अंतःकरणात शंका दाटल्या होत्या. आत्मविश्वास हरवला होता. परंतु मी साईबाबांना अभिवादन करून तसेच दादामहाराजांना नमस्कार करून मूर्ती रंगविण्यास प्रारंभ केला. मी येशूची सुंदर मूर्ती रंगविली. श्रीसाईदत्तांनी माझ्याकडून हे काम करवून घेतले. ऑट्रीस लोबो साहेबानी माझ्या खोलीत येऊन मूर्ती पाहिली. ते अत्यंत खूष झाले. त्यानी मला नोकरीवर घ्यावयाचे निश्चित केले. परंतु मी नोकरीऐवजी दैनिक रु. १५ एवढ्या मोबदल्यावर कामास लागलो. १९३३ पासून १९३५ पर्यंत

तीन वर्षे लोबो साहेबांच्या स्टुडिओत काम केले. हा माझ्या व्यावसायिक जीवनाचा श्रीगणेशा होता. श्रीसाईबाबांचे परमभक्त माझे सद्‌गुरु श्री दादा महाराज यांच्या कृपेतूनच माझ्या व्यावसायीक जीवनाचा पाया घातला गेला.

दादामहाराजांनी माझ्या नुसत्या व्यवसायातच पाया घातला नाही तर माझ्या साईभक्तीची आणि भक्तिसाधनेची वेलही स्वहस्ते लावली मी त्यांचे दर्शनास दररोज जात असे. ते मला दररोज श्री साईबाबांची उदी देत असत. एकदा गुरुपौर्णिमेस दादामहाराजांनी मला बोलावले. त्यांचेकडे गुरुपौर्णिमेच्या उत्सवाची तयारी अनेक दिवस चालत असे. दादामहाराजांनी मला साईबाबांचे दर्शन करून द्यावयाचे आश्वासन दिले होते त्यामुळे मी गुरुपौर्णिमेला अत्यंत उत्कंठतेने उत्सवाला गेलो होतो. तो दिवस गुरुवारचा होता. ते वर्ष १९३५ सालचे होते. वेळ सकाळी ६ ची होती. दादामहाराजांनी त्यादिवशी येणाऱ्या प्रत्येक फकीराला १ रुपया, एक नवे वस्त्र आणि झुणकाभाकर द्यावयाची व्यवस्था केली होती. एका श्रीमंत कुटुंबातील भक्त जमनाबेनवर दादामहाराजांनी ही कामगिरी सोपविली होती. त्या बाईकडे रुपयांचा भरलेला बटवा व इतर साहित्य देऊन सकाळपासून दुपारी २ वाजेपर्यंत या कामगिरीत ती मग्न होती. तरीही त्या बटव्यातील पैसे संपले नव्हते. त्यानंतर दादामहाराजांनी त्या महिलेला आपल्या घरी पाठविले व हे काम माझ्याकडे सोपविले. मी दादांना विचारले महाराज मला दर्शन होईल काय?' दादा म्हणाले, 'अवश्य होईल' मी प्रत्येक फकीराकडे टक लावून पाहत होतो बाबांचे सारखे नामस्मरण करीत होतो. १०० हून अधिक फकीर व असंख्य भिकारी येऊन गेले. रात्री ११ वाजत आले. आमची उत्कंठा वाढत होती. परंतु बाबांचे दर्शन काही घडत नव्हते. ११ वाजता एक फकीर आला. तो म्हातारा होता. दादामहाराजांनी त्याला बसावयास आश्वासन दिले. झुणकाभाकर खावयास घातली. एक नवे कोरे वस्त्र अर्पण केले. आपल्याकडचे ९ रुपयेही दक्षिणा म्हणून हातावर ठेवले. त्यानंतर तो वृद्ध फकीर उठून चालू लागला. तो गेल्यावर मला दादामहाराज म्हणाले, दत्तू तू साईबाबांना पाहिलेस ना?' मी अवाक झालो. त्या वृद्ध फकीराला थांबवून त्याचे पाय धरण्यासाठी मी धाव घेतली. पाहतो तो, तो फकीर दिसेनासा झाला. खरोखरच, ते बाबा होते. दादामहाराजानी गुरुपौर्णिमेस मला बाबांचे दर्शन देण्याचे आश्वासन दिल्यानुसार घडविले होते. त्यांना एक रुपया बटव्यामधून का दिला नाही असे दादांना विचारताच त्यांनी सांगितले की 'अरे बाबाना नवविधा भक्तीचे ९ रुपये हवे होते. त्यानंतर बाबांचे पेंटिंग दादांनी मजकडून करवून घेतले. ते चित्रही त्यांनी एका पारशी गृहस्थाला देऊन टाकले.

साईबाबांचे मी पेंटिंग करीत असताना पुढे प्रसिद्धी पावलेले बाबांचे शिष्य व संत कमूबाबा हे दादामहाराजांच्या दर्शनास येत असत. त्यांचा पोषाख म्हणजे काळी टोपी, काळा कोट असा असे. मी त्यांच्याबद्दल चौकशी करताच दादांनी कोकणी भाषेत मला सांगितले, 'अरे दत्तू, तो मोठो संत होतोलो. या कमूकडे तुकासुद्धा जाऊक लागताला.' कमू बाबा हे पूर्वी बंदुकीचा व्यापार करीत असत. या धंद्यात त्यांना फार मोठी आर्थिक ठोकर बसल्याने ते दादामहाराजांचे चरणाशी आले.

त्यानंतर मी नाटकाच्या नेपथ्याचे काम केले. परंतु माझा तिथे जम बसू शकला नाही. मी सिनेसृष्टीत आर्ट डायरेक्टरही बनलो. तो जमाना मूकपटाचा होता. तेथेही मला यश आले नाही. मी कामकाजाच्या विवंचनेत पडलो. तेव्हा दादामहाराज पुन्हा एकदा माझ्या सहाय्याला धावले. ठाकूरद्वारच्या विद्याराम भाईच्या वाडीतील दत्त-महाराजांनी औदुंबराखालची मूर्ती त्यांनी मला दाखवून रोज सकाळी त्यांचे दर्शन घ्यावयास सांगितले. मी तेथे रोज जाऊ लागलो. तेथेच मला अंतःप्रेरणा झाली की कलेची शाळा काढावी. ही गोष्ट मी दादांना सांगताच त्यानीही आपली संमति दर्शविली. १ जानेवारी १९३६ मध्ये माझ्या 'महिला कला मंदिराचा' जन्म झाला. या मंदिरात हजारो भगिनीनी आजवर कलेचे शिक्षण घेतले असून या कला शाळेला आज ४५ हून अधिक वर्षे झाली आहेत. गिरगाव चौपाटी येथे मी मंदिराची वास्तू ही बांधली असून तेथे कला महाविद्यालय स्थापन करण्याचा माझा उद्देश आहे. माझा या कला आणि व्यवसायाच्या प्रदीर्घ वाटचालीत मला दादामहाराजांसारख्या लोक-सेवक, लोकोद्धारक आणि साक्षात्कारी पुरुषाची छाया लाभली. त्या काळात त्यांचे प्रत्यक्ष मार्गदर्शन लाभले. पुढे त्यांच्या आशीर्वादाच्या छायेत आणि त्यांनी लावलेल्या साईप्रेमाच्या लतामंडपाच्या सुंदर सावलीत माझे कला व व्यवसाय जीवन वाढले म्हणूनच मी त्यांचा सदैव ऋणी आहे.

दादा महाराज मूळचे सावंतवाडी संस्थानच्या मुलखातले. त्यांचे साईदरबार व मठ कुडाळ तालुक्यातील कुडाळ या गावी आहे. तेथे बाबांची एक भव्य मूर्ती बस-विली आहे. मुंबईत हाजी कासम बिल्डिंग, फॉर्जेट स्ट्रीट, येथे तळमजल्यावर दादामहाराजांचे वास्तव्य असे. तेथेही साईबाबांची मूर्ती बसवली आहे. येथे दादा महाराज असंख्य लोकांना मार्गदर्शन करीत. त्यांच्या अडीअडचणींचे निवारण करीत. त्यांना उदी देत व साईभक्तीच्या मार्गाला लावीत. लोकसंग्रही, लोकसेवक पण प्रसिद्धी विन्मुख अशा या थोर पुरुषाचे निर्वाण...रोजी घडले. त्यांची समाधी कुडाळ येथे स्थापन केलेली आहे.

# बाबा सन्त नव्हते, भगवान होते

☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆

—प्रो. ए. पी. त्रिपाठी एम. ए.
[ मराठी अनुवाद प्रो. एच. बी. महाले, एम. एस. सी. ]
ज. ह. शासकीय महाविद्यालय, बैतूल

● शिरडीचे श्री साईबाबा कलियुगात भगवंताचे प्रत्यक्ष अवतार होते. साई बाबा हे साक्षात् भगवंताचे नाव आहे—देवाधिदेव भगवंताचे नाव, परंतु महाराष्ट्रामध्यें ईश्वराच्या अवतारांना संत मानण्याची रूढी प्राचीन काळापासून चालू आहे. भगवद्-गीतेमध्यें भगवान श्रीकृष्णांनी म्हटले आहे की 'संत माझेच रूप आहे. मीच त्यांच्या रूपात भूतलावर येत असतो.' परंतु महाराष्ट्रातील लोक त्यांना संताच्या कोटीपुढे नेताना दिसत नाहीत. महाराष्ट्रामध्यें ईश्वर-शक्तीच्या रूपात आविर्भूत छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात भगवान दत्तात्रय यांनी अक्कलकोट (जिल्हा सोलापूर महाराष्ट्र) : येथे स्वामी समर्थांच्या रूपात अवतार घेतला. गांणगापुरात जाऊन भगवंत दत्तात्रयांची उपासना, व्रत व नवस करणाऱ्या अनेक लोकांना दत्तात्रयांनी स्वप्नात दर्शन देऊन स्पष्ट सांगितले की सध्या मी गांणगापुरात नव्हे, अक्कलकोटात स्वामी समर्थांच्या रूपात प्रत्यक्ष वास करीत आहे. तेथे जाऊन माझे दर्शन घ्या. तुमच्या मनातील इच्छा अक्कलकोटाचे स्वामी समर्थ पूर्ण करतील. स्वामी समर्थांनी सुद्धा सांगितले की आता मी गांणगापुरात नव्हे, अक्कलकोटात राहतो. मग गाणगापुरला जाण्याची काय आवश्यकता आहे? श्री स्वामी समर्थांच्या चरित्राचे खोल अभ्यास करणारे त्यांच्या ईश्वर रूपा विषयी चांगल्याप्रकारे जाणतात, पण अजून सुद्धा लोक त्यांना संत म्हणतात आणि मानतात ही. शेगावचे श्री गजानन महाराज प्रत्यक्ष ईश्वरच होते—भगवंताचेच अवतार होते. निरनिराळे नाव आणि रूप धारण करून ते नेहमी पृथ्वीवर आले आहेत. गीतेचे खालील श्लोक याचा पुरावा आहे—

यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारतः ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥
परित्राणाय साधुनां विनाशायच दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ (गीता अ. ४, श्लोक ७–९)

परंतु जसे भगवान श्रीकृष्णांनी पुढे म्हटले आहे—

अवजानन्ति मा मूढाः मानुषीं तनुमाश्रितं ।
परं भावमजानंतो मम भूत महेश्वरः ॥ (अ. ८ श्लोक ११)

त्याप्रमाणे अजून सुद्धा अशा दिव्य विभूतींवर आम्ही संताचे (मनुष्याचे) रूप मानत आहो. श्री उपासनी महाराज, श्री ताजुद्दीन बाबा, श्री मेहर बाबा, श्री गजानन महाराज व श्री साईबाबा हे सर्व महाराष्ट्रामध्ये आविर्भूत ईश्वराचे वेगवेगळे रूप–कलियुगातील वेगवेगळे अवतार आहेत. परंतु आमच्या दृष्टीमध्ये ते संतांच्या कोटीपुढे जाऊ शकले नाहीत. केवढी विडम्बना आहे ही ! आमच्या अध्यात्म-चेतनेचे केवढे संकुचित स्वरूप आहे हे !

अगदी ह्याचप्रमाणे श्री साईनाथ साठ वर्षापर्यंत शिरडीत आपल्या व्यक्त लीलांनी अव्यक्त स्वरात आपल्या परमेश्वर रूपाचे प्रत्यक्ष प्रमाण देत राहिले आणि कधी कधीं आपल्या स्वतःला सर्व भूतांतरात्मा, अणु-अणु व्यापी आणि संसाराची उत्पत्ति, स्थिती आणि लयाचे नियंता सुद्धा घोषित केले आणि त्याचप्रमाणे लीला आणि चमत्कार दाखवित राहिले, जे फक्त परमेश्वरच करू शकतात, मनुष्य अथवा संत नाही. तरी आम्ही त्यांना 'संत साईनाथ' किंवा दी सैंट ऑफ शिरडी असे उद्बोधून त्यांचे अवमूल्यन करीत आलो आहोत. अयोध्येमध्ये श्रीरामांचा अवतार झाला. त्रेतायुगाची गोष्ट आहे ही. त्यावेळी फारच कमी लोक रामांना परमेश्वराच्या रूपात जाणू शकले. कौसल्यामातेला त्यांचे ईश्वर रूपाचे दर्शन घडले, परंतु वडील दशरथ त्यांना नेहमी आपला मुलगाच मानत राहिले. अनेक लोक सुद्धा त्यांना राजा दशरथांचा मुलगा किंवा राजकुमार रामाचे रूपात पहात असत आणि वनवासाच्या काळात त्यांना एका तपस्वीच्या रूपात जाणत आणि मानत राहिले. परमज्ञानी रावण सुद्धा रामाला तपस्वीच्यापेक्षा जास्त महत्व देवू शकला नाही. द्वापार युगामध्ये परमेश्वर श्रीकृष्णाच्या रूपात त्यांनी पुन्हा अवतार घेतला. नाव आणि रूप बदलले गेले परंतु रंग सावळा राहिला. जेव्हा त्रेतायुगातील राम, द्वापार युगात कृष्ण बनले तेव्हा वायुपुत्र हनुमान सुद्धा त्यांना ओळखू शकले नाही. त्या अवतारात सुद्धा शिशुपाल, जरासंध, कालयवन दुर्योधन ह्यांच्यासारखे लोक त्यांना मानवाच्या कोटीच्या पुढे महत्त्व देण्यास तयार झाले नाहीत. परंतु त्या युगात सुद्धा यशोदा, देवकी, कुंती द्रौपदी, राधा, ह्यांच्यासारख्या देवी त्यांना परमेश्वर म्हणून जाणत आणि मानत होत्या. बिचारा अर्जुन कुरुक्षेत्रात श्रीकृष्णाच्या विराट रूपाचे दर्शन घेतल्यानंतर सुद्धा त्यांना परमेश्वरीशक्तीने संपन्न देवपुरुष मानू शकला. पण युद्ध संपल्यानंतर कृष्णानी जो हुकूम दिला की आधी रथाच्या खाली उतरा, ह्याला अर्जुन उचित रीतीने न समजता औचित्य आणि अनौचित्यात गोंधळून गेला. गोस्वामी तुलसीदासानी 'रामचरित मानस'मध्ये लिहिले आहे—

"सोइ जानइ जेहि देहु, जनाई। जानत तुमहिं तुमहिं होई जाई ॥"

श्रीकृष्णांना बाळपणातच गोवर्धन लीला, कालियामर्दन लीला, अनेक राक्षसांचा नाश करून प्रमाण उपलब्ध केल्यावर सुद्धा द्रौपदीचे वस्त्र वाढवून आणि कुरुक्षेत्रात पांडवांना विजय मिळवून देऊन आपल्या परमेश्वर रूपाचे प्रदर्शन करावे लागले, परंतु त्यानंतरही शंका झाल्यामुळे फार कमी लोक त्यांना ईश्वराच्या रूपात मानू शकले आणि युग संपून गेल्यावर सध्या राम आणि कृष्णांच्या परमेश्वरत्वावर प्रश्नचिन्ह लादण्याचे धाडस कोणी करू शकत नाही, कारण की, ते आता ह्या पृथ्वीवर सदेह हजर नाहीत.

ह्याच प्रमाणे देवाधिदेव परमेश्वर श्री साईनाथांनी पृथ्वीवर सदेह साठ वर्षापर्यंत शिरडीत राहून आपल्या ईश्वरीयता, सर्वज्ञता, सर्वव्यापकता आणि सर्वशक्तिमताचे पुरावे दिले. शास्त्रामध्ये वर्णिलेले–

नमस्त्वनन्ताय सहस्रमूर्तये सहस्रपादाक्षिशिरोरुबाहवे ।
सहस्रनाम्ने पुरुषाय शाश्वते सहस्र कोटिर्वपुधारिणे नमः ॥

ह्या स्वरूपाचे प्रत्यक्ष प्रमाण दिले तरीसुद्धा त्यांच्या सदेह काळात लोक त्यांना वेडा समजत राहिले, भीक मागून पोट भरणारा आणि दुसऱ्यांच्या खिशातून पैसे वसूल करणाऱ्या ढोंगी फकीरापेक्षा जास्त मान देवू शकले नाहीत. ( साई सच्चरित्र–भूमिका–पृ. १० ) बाबा शरीर टाकून गेले आणि जाण्याच्या पूर्वी घोषणा करून गेले की आठ वर्षानंतर मी आंध्रप्रदेशामध्ये पुन्हा येईन, पण त्यांच्या गूढ शब्दांचा अर्थ सर्व लोक आपआपल्या सिमीत बुध्दीने लावत राहिले. ठीक आठ वर्षानंतर नोव्हेंबर, १९२६ मध्ये आंध्रप्रदेशांत प्रगट होऊन मागच्या चोपन्न वर्षापासून ते आपल्या शिर्डी साई रूपाचे बाळपणापासूनच आजपर्यंत प्रदर्शन करीत आले आहेत, परंतु आमच्या जवळ त्यांना अमान्य करण्याचा एकच तर्क आहे की, ते स्वतःला ‘साईबाबा’ का म्हणतात? साईबाबा तर एकच आहे आणि ते म्हणजे शिरडीचेच साईबाबा. जर रामांनी पृथ्वीवर येऊन पुन्हा अवतार घेतला तर त्यांना आपले नाव कृष्ण ठेवावे लागेल. ह्याशिवाय सुद्धा आणखी एक तर्क दिला जातो की, परमेश्वर श्री सत्य साई बाबा जर खरोखर साई बाबा आहेत तर मग ते शिरडीला का येत नाहीत. जो सदेह पृथ्वीवर राहील त्यांचा आम्ही अपमान करूच. येशू ख्रिस्तांना सुद्धा ईश्वरत्व प्राप्त करण्यासाठी क्रॉसवर लटकावे लागले. आमच्याजवळ एवढा वेळ कोठे की, आम्ही तेथे जावून परिश्रम घेवून वास्तविकता काय आहे, हे स्वतःच्या डोळ्यांनी पाहू किंवा श्री साईबाबाचे परमभक्त हरी सीताराम दीक्षित ह्याचे पुतणे श्री. दीक्षित ह्यांना बंगलोरात भेटून चर्चा करू.

शिरडीचे साईबाबांनी म्हटले आहे कि, "नित्य मी जिवन्त जाणा हेचि सत्य" आणि खरोखरच आम्हा लोकामध्ये बाबा सदेह विद्यमान आहेत. "श्री साईलीला" मध्ये प्रकाशित झालेले भक्तांचे अनुभव आणि रेव्याची बहीण आरती श्रीवास्तव, जिच्या घरात मी स्वतः जाऊन सर्व काही लीला पाहू शकतो, जेव्हा मी खतन्याच्या शासकीय महाविद्यालयात हिन्दीचा प्राध्यापक होतो. अनुभवांनी हे प्रकाशित होते की बाबा नेहमी आमच्याजवळ हजर आहेत. बाबा अजर अमर आहेत. ते जीवंत आहेत आहेत आणि गीतेचा श्लोक "अवजानन्ति मा मूढा मानुषीं तनुमाश्रितम्। परं भावभजानन्तो मम भूत महेश्वरः" सुद्धा गीतेमध्ये आज जीवंत आहे आणि त्याच्या प्रत्यक्ष व्याख्येच्या रूपात बाबाचे अस्तित्व 'सन्ता'च्या रूपात आजसुद्धा उपस्थित आहे. आमचा विवेक कोणत्या उपहासास्पद भूमिकेवर जावून पोहोचला आहे? होऊ शकते की महाराष्ट्रातील संत एकनाथ, नामदेव, तुकाराम, ज्ञानेश्वर, निवृत्तिनाथ इत्यादींच्या अभंगात आणि दुसऱ्या ग्रंथात 'संत' शब्दाचे औचित्य प्रतिपादित होत असेल. परंतु 'ध्रुवचरित्रा' प्रमाणे 'संत साक्षात् ईश्वर तर नसतात पण त्यांच्या मध्ये काही ईश्वरीय शक्ती जरूर उपस्थित असते.' (सा. वचनामृत पृ. १६०) संत ते असतात जे की निर्गुण निराकार अथवा सगुण साकार परमेश्वराचे उपासक असतात आणि ज्यांचे साधनेचे अंतिम लक्ष्य असते की सांसारिक जीवनातील चौऱ्यांशीच्या फेऱ्यापासून मुक्ति म्हणजे मोक्ष मिळावा। मग सायुज्य मुक्तीची कामना ठेवा किंवा सारूप्य अथवा सामीप्य मुक्तीची। श्री गोविंदराव दाभोलकर यांनी श्री साई सच्चरित्रात लिहिले आहे की "श्री साई ईश्वराचे अवतार आहेत." (साई सच्चरित्र–हिन्दी–पृ. ७६) "श्री साई स्वतःच ब्रह्मदेवाचे अवतार होते" (तोच–पृ. १९७ व २२४). "बाबा अजर-अमर आहेत कारण ते जीवन-मृत्यूपासून मुक्त आहेत." (पृ. २०६) म्हणून जे स्वतःच परमेश्वर आहेत, जसे श्रीराम, श्रीकृष्ण श्रीस्वामी समर्थ, श्री गजानन महाराज, श्री साईबाबा, श्री रमण महर्षि, श्री ताजुद्दीन बाबा, श्री धुनीवाले दादा, श्री सत्य साई बाबा, श्री उपासनी महाराज, श्री गुलाब बाबा, सती गोदावरी माता, सती अनुसूया माता, ह्यांना 'संत' नाव देवून आपण त्यांना संत नामदेव, तुकाराम, निवृत्तिनाथ, मुक्ताबाई, सोपान, सावता माळी, गोरा कुंभार, गाडगे महाराज, कैकाडी महाराज आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ह्यांच्या पंक्तिमध्ये ओढण्याचा प्रयत्न करतो. ह्या प्रकारे आम्ही आमच्या संकुचित आध्यात्मिक ज्ञानाचे पुरावे देत आलो आहोत.

शिरडीचे साईबाबा जगदाधार, परब्रह्म परमेश्वर, निर्गुण निराकार ब्रह्मदेवाचे सगुण साकार अवतार, ईश्वर होते. त्रेतायुगात ते राम होते, द्वापारयुगात कृष्ण होते, तेच दत्तात्रय होते आणि गीतेच्या "संभवामि युगे युगे" उद्घोषाप्रमाणे कलियुगात

तेच श्री साईबाबा बनून लोककल्याणासाठी पृथ्वीवर अवतरले आहेत. "साईरूप धर राघवोत्तम भक्तकामविबुधद्रुमं प्रभुम्", तसेच "अजन्माद्यमेकं परंब्रह्म साक्षात्स्वयं-संभवं राममेवावतीर्णम्" म्हणून आम्ही त्यांच्या भगवत्स्वरूपाची घोषणा करतो आणि मग त्यांना 'संत' असे नाव देतो. ह्या विसंगतीमुळे भक्ताच्या अंतःकरणाला दुःख वाटते. श्री साईबाबांनी रामाच्या रूपात (श्री साई सच्चरित्र–हिन्दी पृ. ८१, १७५), कृष्णाच्या रूपात (तोच ग्रंथ–पृ. २९० व ३०१) विष्णूच्या रूपात (श्री साई वचनामृत–पृ. १६१), दत्तात्रयच्या रूपात, शंकराच्या रूपात (श्री साई सच्चरित्र–पृ. १७४) इत्यादी निरनिराळ्या रूपात (पृ. ८०, १७७). आपल्या जीवनकाळात आपल्या भक्तांना दर्शन दिले–"जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव दाविसि दयाघना" हेमाडपंतांनी म्हटले आहे की 'दत्तात्रयाचे पूर्ण अवतार नरसिंह सरस्वतींच्या सारखे श्रीसाईबाबा नेहमीच उपस्थित आहेत." (श्री साई सच्चरित्र ह्यासारख्या परम प्रामाणिक ग्रंथाच्या व्यतिरिक्त 'दी ग्लिम्प्सेज ऑफ साईबाबा', 'दी इन्क्रेडिबिल साईबाबा', 'श्री साई दी सुपरमॅन', 'श्री साई वचनामृत', 'श्री साई लीलामृत', 'भक्तांचे अनुभव' इत्यादी अनेक ग्रंथ अशा प्रमाणांनी भरून पडले आहेत. इतकेच नव्हे तर, १५ आक्टोबर, १९१८ विजयादशमीच्या दिवशी महासमाधी घेतल्यापासून आजपर्यंत अनेक लीलांनी भरलेले दर्शन जसे 'जया मनी जैसा भाव' भक्तांना देवून देवाधिदेव श्री साईनाथ आता सुद्धा आपले परमेश्वररूपांनी अवगत करीत आले आहेत आणि आम्ही जेथे तेव्हा होतो, तेथेच आहोत. आजसुद्धा आम्ही त्यांना 'शिरडीचे संत' अथवा 'दी सेन्ट ऑफ शिर्डी' उद्बोधून आपल्या 'वाचा-दारिद्र्याचे' प्रदर्शन करून राहिलो आहोत. केवढी विडंबना आहे ही! गीतेचे खालील श्लोक आमचे मार्गदर्शक बनण्याकरिता प्रस्तुत आहेत–

अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्तेमामबुद्धयः ।
परं भावमजानन्तो ममाव्ययमनुत्तमम् ॥

नाहं प्रकाशः सर्वस्य योगमाया समावृता ।
मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम् ॥ अ. ७, श्लोक २४-२५ ॥
ओम् श्रीसाई यशःकाय शिरडीवासिने नमः ।

★

# श्रीकृष्ण सरस्वती महाराज

**श्री बाळासाहेब नाडकर्णी**
१२१/डी, दत्तमहाराज गल्ली, कोल्हापूर

● कोल्हापूर हे जगदंबेचे मूळपिठ आहे. तसेचे श्री दत्तगुरूंचे भिक्षास्थान आहे. श्री महालक्ष्मी व दत्तावतारी श्रीकृष्ण सरस्वती महाराज हे कोल्हापूरचे वैभवच म्हणावयाचे!

श्री साईबाबांच्या प्रमाणे इथे श्री कृष्णसरस्वती महाराजांनी पुष्कळ लीला केल्या आहेत. ह्या महाराजांनी श्रावणवद्य दशमी सन १९०० साली समाधी घेतली समाधीस्थान-वैराग्य मठी; व निजबोध तथा व्यासमठी ही दोन कृष्णसरस्वती महाराजांची मुख्ये स्थाने आहेत. समाधी घेतल्यापासून म्हणजे ८१ वर्षे आता पूर्ण होत आहेत, निजबोध-व्यासमठीमध्ये अखंडवीणा उभा आहे. दर्शनासाठी हे स्थान रात्रंदिवस मुक्त आहे. वीणा घेण्यासाठी स्त्री-आबाल-वृद्धजन मोठ्या प्रेमभक्तीने इथे येत असतात. भगवंताचे नामस्मरण वीणाच्या नाद झंकारात अहोरात्र इथे सुरू असते. मी बालपणापासून इथे जात येत असतो; व मिळेल त्यावेळी वीणा घेत असतो त्यामुळे मला पुष्कळ अनुभव पहावयास मिळाले आहेत. माझे आई-वडील ह्या महाराजांचे खास भक्त म्हणून व त्यांची थोर पुण्याई म्हणून ह्या समर्थ शक्तीचा प्रभाव मला पहावयास मिळाला आहे व अजूनही मिळत आहे.

आम्हाला श्री साईबाबा व श्रीकृष्ण सरस्वती महाराज वेगवेगळे आहेत हा विचारहि मन-बुद्धीला शिवत नाही.

आमच्या मातोश्री श्रीमती सिताबाई व बंधु चि. अशोक हे शिरडीला बाबांचे दर्शन घेण्यासाठी गेले होते. वैकुंठ आगळा असणारा तेथील थाट्माट पाहून आल्यावर दुसऱ्याच दिवशी मला पूजा करताना आढळून आले—की, स्वामी समर्थ अक्कलकोट महाराजांच्या फोटोच्या पुढ्यात जमीनीवर चार जवळ जवळ कोपरे साधून कुंकुवाच्या चिमटी पडल्या होत्या! मी देवांच्या फोटोला कुंकू लावित असतो पण रेखीवपणे मी जमिनीवर कुंकु कशाला टाकीन? ह्याबद्दल आम्ही घरात बराच विचार व चर्चाहि केली तेव्हा रात्री स्वप्नी-दृष्टांतमध्ये श्री साईबाबांनी आमच्या मातोश्रींना सांगितले 'ये मेरा गुरुस्थान है।' ह्यानंतर मी पुजा करताना ते कुंकु पुसले जाऊ नये म्हणून फार फार दक्षता घेत असे, परंतु ते नंतर जवळ जवळ दोन महिन्यांनी व हवामानामुळे म्हणा पुसट पुसट अस्पष्ट होत ते अदृष्य झाले!

ह्याच सुमारास दि. ८ जुलै १९७९ रोजी गुरुपौर्णिमा होती म्हणून मी औदुंबर व नसिंहवाडीला जाऊन रात्री ११ वाजता कोल्हापूरला आलो. भोजन वगैरे आटोपून वरती उधृत केलेल्या निजबोधमठीमध्ये वीणा घेण्यास गेलो होतो. वीणा घेतल्यानंतर इथे मी काही भक्तीगीत म्हणत असतो, त्यावेळी माझे एक स्नेही व ह्या मठीचे मालक श्री. आर. एन. रायरीकर (ॲडव्होकेट) हार्मोनियम-पेटीची साथ करीत असतात ह्या दिवशी मात्र ते पुण्याला गेले होते, व मी त्यावेळी महाराजांच्या पुढ्यात एकटाच वीणा झंकारीत गीत गात होतो—

धन्य अवधूतांची लीला।
साईनाथ फकीर झाला ॥ धृ० ॥

वैकुंठ शिरडी होई।
मक्का मदिना द्वारकामाई।
भक्ती ज्ञानाचे पीठ होई।
बाबा तिथे भुलवी जगताला ॥ १ ॥

स्वामी समर्थ प्रज्ञापुरीचे।
सामर्थ्यही वैभव त्यांचे।
चार दिप ज्वलंत भूतळीचे।
तेवती अजुन त्या धुनीला ॥ २ ॥

घेऊनी फकीर वेषाला।
प्रभु रामचंद्र हा सजला।
की गिरिजा पती हा भोला।
श्रीकृष्ण सरस्वती गमला ॥ ३ ॥

दिपावली तैल ना मिळता
पाण्यातून दिप पेटविता
पडक्या भींती उजळीता
शिरडी दीपवी जगताला ॥ ४ ॥

मीच लिहून स्वरबद्ध केलेले हे गीत गाताना महाराजांनी मला इतके रमवले की शेवटचे चरण ‘ शिरडी दीपवी जगताला, ’

ओळीतील “दीऽऽ” हा शब्द माझ्या मुखातून बाहेर पडत असतानाच समोरील श्रीकृष्ण सरस्वती महाराजांच्या मखराभोवतालची इलेक्ट्रीक बल्बची माळ

आपोआप लागली. प्रकाशमान झाली ! तेव्हा शेजारील घड्याळात पहाटेचे पावणेचार वाजले होते. त्यावेळी मला भीती नाही. पण सर्वांगावर रोमांच उभारले, व हेही जाणवले की आता आपणासमोर श्रीकृष्ण सरस्वती महाराजासमवेत श्री साईबाबा पण हजर आहेत व त्यांना मी लिहिलेले हे गीत आवडले आहे !

या प्रज्वलीत होणाऱ्या इलेक्ट्रीक बल्बच्या माळेचा स्विच बाजूलाच तिथे आहे. तो स्विच ऑन ऑफ करणारी माझ्या व्यतिरिक्त दुसरी कोणतीही व्यक्ती तिथे हजर नव्हती. श्रीकृष्ण सरस्वती महाराज हे अक्कलकोट महाराजांचे शिष्य आहेत, व शिरडीला गुरुस्थानास असलेल्या पादुका पण श्री अक्कलकोट महाराजांच्या आहेत. ज्यांनी पाण्यातून दीप उजळून शिरडीक्षेत्र दुनियेत दिपवले, त्यांचेच हे कार्य आहे ! त्यांनीच माझ्या मनःचक्षूस गुरुपौर्णिमेस गुरुबंधूचा दरबार प्रकाशमान करून दाखवून दिला ! त्यांच्या अगाध कृपासिंधूत मला माझ्या जीवनात ही एक ओंजळ अनुभवास आली. जीवीताच्या धन्यतेसोबत आमच्यावरील प्रेमळ कृपेचे श्री साईबाबांनी दिलेले हे एक प्रमाणपत्र ( सर्टीफिकेट ) आहे असे समाधानपणे म्हणावेसे वाटते.

★

## श्री. अनंत बाप्पाजी रत्नपारखी यांचे निधन

श्री साईबाबांच्या सानिध्यातील बाप्पाजी लक्ष्मण रत्नपारखी यांचे सुपुत्र श्री साई संस्थानचे पुजारी श्री. अनंतराव यांचे हृदय विकाराने मंगळवार दि. ५–१–८२ रोजी रात्रौ १२-१५ वाजता दुःखद निधन झाले. त्यांनी संस्थान सेवेत २४ वर्षे घालवीली. मृत्यू समयी त्यांचे वय ६० वर्षाचे होते. श्री. अनंतराव श्री साईबाबांचे मूर्तीला मनोभावे मंगल स्नान घालीत असत.

त्यांचे मागे त्यांची पत्नी, तीन भाऊ व एक बहिण असा परिवार आहे.

त्यांचे आजोबा श्री. लक्ष्मण रत्नपारखी ( श्री साईबाबा त्याना मामा म्हणत असत. ] याना बाबांनी देह ठेवल्यावर दिलेल्या दृष्टांता प्रमाणे दि. १७–१०–१९१८ रोजी शेवटची काकड आरती केली, व तीच आरती अखंड चालू आहे.

कै. अनंतराव यांच्या मृतात्म्यास श्री साईबाबा चिरशांती देवो.

8

# श्रीसाईबाबांच्या कृपेने फर्स्टक्लास मिळाला

—श्री. किशोर गोविंदराव सूर्यवंशी
[ एम. कॉम. आय. ]
मु. पो. हंगे, ता. पारनेर
जिल्हा अहमदनगर पिन ४१४३०१

"जो जो मज भजे जैशा जैशा भावे ।
तैसा तैसा पावे मीही त्यासी ॥"

● संतशिरोमणी श्री साईबाबांची ही वचने साईभक्तांना आता दैनंदिन झाली आहेत, तथापी दैनंदिन जीवन जगत असताना अनेक छोट्या मोठ्या प्रसंगातून या वचनांची प्रचिती आपणास वारंवार येत असते. बाबांच्या कृपेने माझी मनिषा कशा प्रकारे पूर्ण झाली, त्यासंबधी थोडक्यात माहीती या लेखाद्वारे देण्याचा प्रयत्न करीत आहे.

एप्रिल, १९८१ मध्ये 'पुणे विद्यापीठाने' 'बी. कॉम.'ची परीक्षा घेतली. अनेक विद्यार्थ्यांपैकी मीही एक या परीक्षेचा विद्यार्थी होतो. तसे पाहिले तर पेपर्स सोपे होते, पास होण्याची पूर्ण खात्री, परंतु फर्स्ट क्लासची अपेक्षा. मानवी मन हे चंचल असते, रिझल्ट लागेपर्यंत या गोष्टींकडे सारखे लक्ष.

यावर्षी बी. कॉम. चे निकाल फार लवकर म्हणजे अवघ्या ५८ दिवसात लागले. निकाल जाहीर झाल्याची बातमी मला गावीच समजली. संध्याकाळ झाल्यामुळे दुसऱ्या दिवशी नगरला कॉलेजमध्ये जावून निकाल घेण्याचा विचार केला. संध्याकाळी प्रार्थना झाल्यानंतर बाबांचे मनोभावे दर्शन घेवून माझी अपेक्षा बाबांपाशी व्यक्त केली.

रात्री झोपी गेलो तेव्हा झोपेत बाबांनी दृष्टांत दिला बाबा काही बोलले नाहीत. परंतु स्वप्नात बाबांची सस्मीत हास्य करणारी व आशिर्वाद देणारी मूर्ती आली, तो आशिर्वाद आणि ते हास्य अद्यापही माझ्या डोळ्यासमोर जसेच्यातसे उभे रहाते.

दुसऱ्या दिवशी सकाळी पहिल्याच गाडीने नगरला गेलो. अहमदनगर कॉलेजवर जाऊन निकाल हातात घेतला आणि काय आश्चर्य! बाबांच्या कृपेने खरोखरच

मला फर्स्ट क्लास मिळाला, व रात्रीच्या स्वप्नाचे कोडे उलगडले. सर्वोच्च मार्कस "Advanced Accounting and Auditing" या विषयात ८०% मिळाले. आमच्या वर्गात ११४ विद्यार्थी होते, पैकी फक्त दोघांना फर्स्ट क्लास मिळाला. त्यात माझा समावेश होता. या यशाबद्दल सर्व प्राध्यापक व मित्रांनी माझे अभिनंदन केले, मी सर्वांचे आभार मानले.

ज्या अहमदनगर महाविद्यालयात एफ. वाय. बी. कॉम. ला ॲडमिशन मिळणे कठीण झाले होते. त्या ठिकाणी बी. कॉम फर्स्ट क्लासमध्ये सुटलो त्यामुळे कष्टाचे सार्थक झाल्याचे समाधान लाभत आहे. कारण खेड्यातून शहरात शिक्षण घेण्यासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. परंतु कष्टाचे योग्य फळ ईश्वर दिल्याशिवाय रहात नाही हे निर्विवाद आहे.

वडील श्री. गोविंदराव मारुती सूर्यवंशी हे कट्टर साईभक्त असून 'साईलीला' मासिकाचे आजीव सभासद आहेत, घरातील आराध्य व पूज्य दैवत श्रीसाईबाबांचे त्यामुळे प्रत्येक सुखदु:ख आम्ही बाबांपाशी सांगणार.

पुष्कळवेळा जास्त श्रम घेऊनही शेवटी निराशा पदरी पडते परंतु दैव आणि ईश्वरी शक्ती जर आपल्या पाठीशी असेल तर या जगतात काहीच अशक्य नाही, परंतु अशा वेळी आवश्यकता आहे ती श्रद्धा आणि सबुरीची. कारण–

'God is Creater of Human'
दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्ये पाहो।
जो जे वांछील तो ते लाहो। प्राणिजात ॥
(ज्ञानेश्वरी अध्याय–१८, ओवी ॥ १७९५॥

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वरांच्या पसायदानाप्रमाणे ईश्वरीशक्ती ही सदैव जगताच्या कल्याणासाठी उभी आहे.

बाबांच्या या उपकारांची फेड मी एक पामर काय करू शकणार? परंतु देव भावाचा भुकेला हेही त्रिवार सत्य आहे. बाबांचे हे कृपाशिर्वाद सदैव सर्वांच्या पाठीशी राहोत ही विनम्र प्रार्थना करून बाबांच्या चरणी शतशः प्रणाम!

८५

# श्री साईलीला लेखक-कवी आठवे स्नेहसंमेलन शिरडी १९८२

— साईनंद

श्री साईबाबा संस्थान शिरडीच्या श्री साईलीला या मुखपत्राच्या लेखक-कवींचे आठवे-स्नेहसंमेलन रवि. जानेवारी ३१ व सोम. फेब्रुवारी १ या तारखांना शिरडी येथे भरविण्यात आले होते. १९७५ साली अशा स्वरूपाचे संमेलन प्रथमच भरविण्यात आले होते, तेव्हापासून यंदाच्या वर्षापर्यंत ही परंपरा कायम आहे. यंदा सुमारे ६५ वर लेखक–कवींचा मेळावा एकत्र आला व दोन दिवसांचा सोहळा सुव्यवस्थितपणे यशस्वी पार पडला.

श्री साईलीलेतून गेल्या आठ वर्षांत निदान चार तरी लेख किंवा कविता ज्या साहित्यिक भक्तांच्या छापल्या गेल्या आहेत अशानाच निमंत्रण देण्यात आले होते. यंदा हे संमेलन जुन्या भोजन गृहाच्या दालनात भरविण्यात आले होते. तिथे मुलायम गादीच्या बैठका अंथरुन बसण्याची सोय करण्यात आली होती. संमेलनास अध्यक्ष म्हणून अहमदनगरचे प्रख्यात साईभक्त व श्री साईबाबांच्या कृपाशिर्वादाने जन्मलेले श्री दत्तात्रय दामोदर उर्फ नानासाहेब रासने सपत्नीक हजर होते. श्री नानासाहेबांचे वय सध्या ८१ वर्षांचे आहे. सवा वर्षाचे असताना नाना बाबांच्या मांडीवर बसले व तेव्हापासून त्यांना बाबांच्याबद्दल जो जिव्हाळा प्रेम व भक्ती वाटत आहे ती अगदी आजतागायत. संमेलनास मुंबईचे डॉ. के. भ. उर्फ अण्णासाहेब गव्हाणकर व अहमदनगरचे श्री. ग. ज. चितांबर हे दोन भूतपूर्व अध्यक्ष हजर होते. याशिवाय मूर्तिजापूरचे प्रख्यात संत परमहंस श्रीपुंडलिक महाराज, त्यांचे बंधू श्री. नारायणराव, परमहंस मासिकाचे संपादक श्री. बाबासाहेब धांडे व इतर भक्त मंडळी हजर होती.

संमेलनास मुंबईहून श्री. व सौ. जी. आर. इनामदार, श्री. डी. आर. खडके, श्री. अनिल रसाळ, श्री. रमाकांत पंडित, विजय हजारे, माधवराव गोरे, राधाकृष्ण गुप्ता, श्री. व सौ. कलावती चव्हाण, एन. जी. परुळेकर, आप्पा सामंत श्री. व सौ. श्रीराम सातर्डेकर, श्री. व सौ. बिपिन स्वादीया, डॉ. अ. का. पाठक, श्री. र. शं. जुन्नरकर, श्री. व सौ. ग. रा. पालकर, राजा रावळ, मधुकर वखारे, सूर्यकांत दळवी, श्री. व सौ. कुमुदिनी टिळक. सौ. व श्री. प्रभाकर कोंळमकर, विलास पडवळ, सौ. अस्मिता दांडेकर, सौ. शांता सरोदे, सौ. सुशिला शिंदे, लीलाताई गोलतकर, श्री. व

सौ. शशिकला रेवणकर, श्रीमती श्री. शहाणे इ. लेखक कवी मंडळी आली होती. पुण्याहून श्री. र. श्री. पुजारी, श्री. जगन्नाथ कुलकर्णी, श्री. दत्तात्रय मोरे, श्री. रघुनाथ सांडभोर; लोनावळ्याहून डॉ. सौ. सुमती खानविलकर, डॉ. इंदूताई नाईक श्री. बाळकृष्ण देसाई; कोल्हापूरहून डॉ. रा. सी. कापडी, श्री. बी. एस. देसाई, श्री. सदाशिव व्यंकटेश कुलकर्णी, धुळ्याहून श्री. नागेश मोगलाईकर, सौ. लीलाताई मराठे, श्री. व सौ. जगदीश देवपूरकर; नवापूरहून श्री. रमेश चव्हाण, श्री. हसमुख पाटील, श्री. मधुकर मंडलिक, दौ. चिं. सूर्यवंशी, शांतीलाल दवे; भंडाऱ्याहून डॉ. सौ. मालती राहाटे, बिदरहून प्रा. गुंडेराव पटवारी, इंदूरहून सौ. व श्री. बापूसाहेब निरखे, श्री. प्रकाश कर्पे, डॉ. बाबाजी, पिंपरीहून श्री. व सौ. प्रमोदिनी पोतनीस, उस्मानाबादहून सौ. व श्री. ग. दे. कुलकर्णी, शिरुडहून श्री. बी. डी. जगतपुरीया, बैतुलहून श्री. ए. पी. त्रिपाठी व प्रा. एच. बी. महाले, दमणहून श्री. सी. एच. दापरे, वर्ध्याहून श्री. अनिलकुमार लुतडे, चंदीगडहून श्री. जुगल किशोर पुरी व खुद्द शिरडीच्याच सौ. उषाताई मुळे, श्रीमती लीलाताई गुजराथी व निवृत्ती गोंदकर पाटील ही मंडळी हजर होती.

रविवार ता. ३१ जानेवारी रोजी सकाळी ठीक दहा वाजता या संमेलनाचे उद्घाटन व पाहुण्यांचे स्वागत मा. श्री. क. हि. काकरेसाहेब कोर्टरिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांनी केले. त्यानंतर मुंबईचे साईभक्त श्री. श्रीराम सातर्डेकर यांनी श्री. नागेश मोगलाईकर व श्री. एन. जी. परुळेकर या दोघांनी वेगवेगळी रचलेली स्वागतगीते म्हटली. नंतर साईच्या प्रतिमेस पुष्पहार घालून व त्यांच्या समोर समईची ज्योत तेवत ठेऊन अध्यक्ष श्री. रासने यांनी संमेलनाचे कार्यास सुरवात केली.

स्वागतगीताच्या कार्यक्रमानंतर संमेलनाची संपूर्ण योजना सांगण्यात आली, व संमेलनाचे अध्यक्ष श्री. नानासाहेब रासने यांचा परिचय करून देण्यात आला. हा कार्यक्रम कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांनी पार पाडला.

या कार्यक्रमानंतर श्रीसाईलीलाच्या फेब्रुवारी १९८२ च्या श्रीसाई काव्यबहार अंकाचे अध्यक्षांचे हस्ते प्रकाशन करण्यात आले. ज्या कवींनी या अंकात हजेरी लावली होती त्या कवी मंडळींना अध्यक्षांचे शुभहस्ते अंकाची भेट प्रत व प्रसादरुपी सत्कार देण्यात आला.

यानंतर ‘संत समागम’ या श्री. सदानंद चेंदवणकर यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन परमहंस श्री पुंडलीक महाराजांचे शुभहस्ते करण्यात आले. हे पुस्तक पुण्याच्या साक्षात्कार प्रकाशनातर्फे प्रकाशित करण्यात आले असून त्यात प. पू.

गगनगडकर महाराज, मुक्तानंद स्वामी, गोदावरी माताजी, अण्णासाहेब पट्टेकर महाराज, गुलाबबाबा, श्री सिद्‌राज माणिकप्रभु महाराज इ. दहा हयात व श्रेष्ठ अशा संतांची ओळख करून देण्यात आलेली आहे. या प्रकाशन समारंभानंतर प्रकाशन संस्थे-तर्फे श्री. हर्डीकर यांनी निवेदन केले. यानंतर या संमेलनाला आलेल्या स्त्री-पुरुष भक्त मंडळींनी आपापला परिचय थोडक्यात करून दिला. लेखक-कवी भक्तमंडळी नंतर दुपारच्या आरतीला गेली. प्रसादग्रहणानंतर अल्प विश्रांती होऊन दुपारी ठीक ३–३० वाजता दुसऱ्या सत्रास सुरुवात झाली.

दुपारच्या सत्रापूर्वी काही मंडळींनी २ वाजताच आपापल्या गीतांचा कार्यक्रम संमेलनस्थानी सुरू केला होता व तो चांगलाच रंगला.

या दुपारच्या सत्रास अनेकांनी लेखी ठराव पाठविले होते तर अनेकांनी ठरा-वांचे निवेदन तोंडी केले. या सर्व ठरावांवर साधकबाधक चर्चा होऊन त्या सर्व ठरा-वांना प्रश्नांना उत्तरे दुसरे दिवशी सायंकाळी श्रीसाईलीला मासिकाच्या इंग्रजी आवृत्तीचे कार्यकारी संपादक डॉ. श्री. दि. परचुरे यांनी दिली.

सुरुवातीस कोल्हापूरचे डॉ. आर. एस. कापडी यांनी सूचना निवेदन केल्या. त्यावर लोनावळ्याच्या डॉ. सुमती खानविलकर बोलल्या व ठराव सुचनांच्या कार्य-क्रमाला तोंड लागले.

१) **श्री. प्रभाकर कोळमकर, मुंबई यांनी** श्रीसाई साहित्यविषयक लेख, कविता, अनुभव, संशोधनपर लेखन साहित्य इ. च्या पुस्तक किंवा ग्रंथरुपी प्रकाशनास संस्थानने उदार हस्ते अनुदान द्यावे तसेच साईभक्त लेखक-कवी यांच्या होतकरू हुशार मुलांना शैक्षणिक शिष्यवृत्ती देण्याची योजना आखावी असे सांगितले.

२) **श्री. आद्या प्रसाद त्रिपाठी, बैतुल यांनी** श्री साईलीला इंग्रजी-हिंदी आवृत्तीमध्ये तीन चतुर्थांश पाने इंग्रजीला व १/४ पाने हिंदी मजकूराला दिली जातात हे योग्य नव्हे निदान हिंदी मजकूरासाठी निम्मेतरी म्हणजे ३२ पाने दिली जावीत. हिंदी विभागात जवळ जवळ सर्वच पाने कवितांनी भरून काढली जातात ती गद्य मजकूराने भरून काढली जावीत संस्थानतर्फे प्रकाशित झालेले अन्य भाषेतील ग्रंथ हिंदीतही उपलब्ध व्हावेत अशी सूचना मांडली.

३) **सौ. शशिकला रेवणकर, अंबरनाथ यांनी** श्री साईलीलेतून श्री साईसमकालीन भक्त उदाहरणार्थ नानासाहेब चांदोरकर, गोपाळराव बुटी, काकासाहेब

दिक्षित, काशिराम शिंपी, म्हाळसापती इ. वर लेख अधूनमधून यावेत त्यामुळे जुन्या पिढीतील थोर साईभक्तांची नव्या भक्तांना माहिती होईल, आणि हे सर्वजण साई भक्तीत साईसेवेत कशाप्रकारे रमलेले होते त्यांची श्रद्धा व भक्ती भावना हे पण समजून येईल व त्यांच्या विषयी आदरभाव राहिल अशी सूचना केली.

४) **श्री हसमुख ओंकार पाटील, नवापूर यांनी** श्री साईलीलेची हिंदी आवृत्ती निघावी त्यामुळे परप्रांतात सुद्धा श्री बाबांच्या बद्दलची माहिती प्रसारित होईल अशी सूचना मांडली.

५) **डॉ. अ. का. पाठक मुंबई यांनी** साईलीला लेखक-कवींचे पत्ते छापले जाऊन त्यांची एक सूची तयार करावी तसेच भारतातील साईमंदिराचे पत्तेही यादी रूपाने प्रकाशित करावेत असे सांगितले.

६) **श्री. डी. बी. पोतनीस, पिंपरी यांनी** लेखक-कवी संमेलन प्रसंगी लेखक कवींचे व्यक्तिगत सत्कार केले जातात तरी असे सत्कार होऊ नयेत. श्रीसाई लीला लेखक कवी यांना मिळणारी निमंत्रणे वेळेवर मिळतील अशी व्यवस्था केल्यास सोईचे होईल. त्याचप्रमाणे लेखक कवी यांच्यावर कमीत कमी चार वेळा लिखाण प्रसिद्ध झाल्याचे निर्बंध घातले आहेत. ते निर्बंध सैल व्हावेत. श्री साईलीला मासिक जास्त प्रमाणात प्रसार व्हावा व तसे प्रयत्न लेखक-कवी व इतर वर्गणीदार यांनी करावेत. श्री साई सद्भक्त लेखक, कवी यांना श्रीसाई समाधिवर अभिषेक करण्यास सामूदायिक अभिषेक करावा लागतो. तरी पाच पाच लेखक कवी ज्यांना अभिषेक करावयाचा असेल यांना परवानगी द्यावी. या सूचना मांडल्या.

७) **श्री. हजारे विजय दत्ताराम, मुंबई** यांनी हिंदी विभागाची पाने वाढवावीत आणि पद्याप्रमाणे गद्याला अधिक प्रसिद्धी द्यावी. सतत नियमित तीनपेक्षा अधिक महिने एकाच लेखक कवीचे साहित्य प्रसिद्ध करू नये. त्यामुळे तोच तोच पणा जाणवतो. तो काढता आल्यास पहावे. . . . . . . . .

आज साईभक्त लाखाने कोट्यावधी झाले आहेत त्या प्रमाणात साईलीला मासिकाचा प्रचार व्हावा ठिकठिकाणी ( मोक्याच्या ठिकाणी ) तसेच दादरला संस्थानच्या मुंबई कार्यालयाबाहेर सर्वांना दिसेल अशा श्री साईलीला मासिकासंबंधीचा बोर्ड लावावा. म्हणजे बहुसंख्य लोकांना बाबांची लीला कळेल व श्रीच्या नावावर चाललेल्या फसवणूकीचा प्रकाराना पत्रसाखळी, अवतार वगैरेना खिळ बसू शकेल.

संमेलनाची मुदत वाढवावी, बंधने अटी काढून टाकून खऱ्या अर्थाने भक्तीचा मळा मनमोकळा फुलवावा नाहीतर होते काय तर येरे माझ्या मागल्या.

साठ वर्षे पूर्ण झाल्याचा प्रित्यर्थ साईलीलेच्या लेखकाचे प्रातिनिधिक गद्य-पद्य संग्रह काढावेत. बालाजी देवस्थानानंतर उत्पन्नाच्या बाबतीत श्री साईबाबा संस्थानचा क्रमांक लागतो. त्यामुळे हे अशक्य आहे असे म्हणता येणार नाही तरी प्रयत्न करावा. या सूचना केल्या.

८) श्री. **श्रीराम व्ही. सातर्डेकर, मुंबई** संमेलनाचा तक्ता भरून पाठविणारे पृष्ठ यावर्षी स्वतंत्र छापल्यामुळे आपल्या गतवर्षीच्या सूचनेची दखल घेतल्याबद्दल संपादक महाशयांचे हार्दिक अभिनंदन.

अंक पोष्टात १ तारखेपूर्वी पोष्ट केला जातो असे चौकशी अंती समजले. परंतु ८ ते १० तारखेपर्यंत तो लोकल मुंबईत मिळत नाही. याबाबतीत पोष्ट ऑफिसमध्ये तक्रार केली असता, अंकाच्या रॅपरवर नियमाप्रमाणे रबर स्टॅम्पने पोष्टिंगची तारीख छापावी लागते ती छापली जात नाही त्यामुळे तक्रारीला महत्त्व दिले जात नाही.

स्नेहसंमेलनाविषयी नोव्हेंबर दिवाळी अंकात प्रसिद्ध करावे. कारण डिसेंबरचा अंक बंद असतो. ७ तारखेस मला अंक मिळाला. मी लगेच तक्ता भरून पाठविला. ९–१० तारखेस शिरडीला जाईल. आपल्या निमंत्रणाची वाट पाहणे. (कारण आपले निमंत्रण आल्यावर एस. टी. चे रिझर्व्हेशन १० दिवस अगोदर करावे लागते. तेव्हा धावपळ होते. ही मुंबईची स्थिती मग लांबून येणाऱ्या उदा. कलकत्ता, मद्रास, बंगलोर या रेल्वेने प्रवास करणाऱ्या भक्तांची गैरसोय यामुळे होते. तेव्हा दिवाळी अंकातच संमेलन तक्ता पाठविणे. या सूचना केल्या.

९) श्री. **सांडभोर आर. बी. पुणे, यांनी** कवि लेखक संमेलन ठरविताना त्यासाठी शक्यतो १ ते १० तारखेचे दरम्यान निश्चित करण्यात यावा. कारण पैसे अभावी इच्छा असूनही हजर राहाणे शक्य होत नाही.

कवि लेखक संमेलन हे २ दिवसापेक्षा एक दिवसांनी (३ दिवसाचे असावे) वाढविण्यात यावे. कारण सदर कार्यक्रमास कवि, व लेखक महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून हजर राहतात त्यामुळे तेथील आनंदाच्या उपभोग तसेच देवदर्शनाचा लाभ यथेच्छ घेता येईल तरी संमेलन हे कमीत कमी १ दिवसांनी तरी वाढवावे.

प्रसाद भोजनाचा कार्यक्रम हा सर्व लेखक व कवि यांच्या एकत्र पंक्तीतच झाल्यास त्यास जादा शोभा येऊन कार्यक्रमात नाविन्य येईल. असे सांगितले.

१०) श्री. **माधव गजानन गोरे, यांनी** आपले संमेलन जिथे भरणार आहे. तिथे त्या मंडपाला हेमाडपंत नगर असे नाव द्यावे व त्याप्रमाणे एक कापडी फलक मंडपाच्या प्रवेश द्वारी लावावा. त्याचप्रमाणे प्रत्येक वर्षी श्री साईबाबांच्या सानिध्यात असलेल्या प्रमुख भक्तांची नावे द्यावीत. उदा. दासगणू नगर, काकासाहेब दिक्षितनगर, गोपाळराव बुटी नगर, नानासाहेब चांदोरकर नगर, माधवराव देशपांडे-नगर इ. सूचना केल्या.

११) श्री. **कर्पे प्रकाश प्रभाकर, इन्दौर, यांनी** बाल विशेषांकात प्रसिद्ध झालेल्या लहान साई लेखकांना पण संमेलनात उपस्थित राहाण्याची परवानगी द्यावी. त्यांच्यासाठी अमुक वर्षात इतके लेख अशी अट ठेऊ नये. त्यांना साईप्रसाद देऊन उत्साह वाढवावा.

संमेलनाच्या परवानगीसाठी आवश्यक तक्ता मध्य पृष्ठांवर दिला गेल्याने कव्हर पान सुशोभित राहिले. संमेलनात भाग घेण्यासाठी आवश्यक गद्य पद्य संख्येची अट कोर्ट रिसिव्हर साहेबांनी बरीच सैल केली म्हणून त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

गेल्या २–३ वर्षापासून श्री साईबाबांविषयी हवे ते विचारा कार्यक्रम संमेलनात ठेवण्यात येतो. पण तो होत नाही. जे कार्यक्रम थोडक्या वेळात होऊ शकतील तेच ठेवावे. संमेलनाची प्रथम रात साई दरबारात साईभक्तांची हजेरी याच रूपात ठेवावी.

भक्तांसाठी नवी माहिती पूर्ण लेखमाला हे सदर फार प्रभावी आहे. श्री साईलीला ( इंग्रजी आवृत्ती ) मध्ये हिन्दी पानांची वर्तमानसंख्या वाढवली पाहिजे अशी माझी इच्छा आहे. अशा सूचना केल्या.

१२) श्री. **गजानन कृ. निरखे, इंदौर, यांनी** बालविशेषांकात प्रकाशित झालेल्या लहान साईलेखकांना संस्थानतर्फे विशेष पारितोषिक देऊन त्यांचा गौरव करावा. आजचे बाल लेखक उद्याच्या श्री साईलीलेचे आधार बनतील. ही गोष्ट लक्षात घ्यावी.

मध्यप्रांतात देशाच्या अन्य प्रांतांत श्री साईबाबांच्या हिन्दी भाविक भक्तांची संख्या दिवसेदिवस वाढत जात आहे. ही गोष्ट लक्षात घेऊन श्री साईलीलेची हिन्दी स्वतंत्र आवृत्ती काढण्याची व्यवस्था व्हावी किंवा हिन्दीची वर्तमान पृष्ठसंख्या वाढवावी ही सदिच्छा. मध्यप्रांतातून हिन्दी वाचक सदस्य देण्याची जबाबदारी घ्यायला मी तयार आहे. या सूचना केल्या.

१३) **सौ. उषा प्रभाकर मुळे शिरडी यांनी** श्रीसाईलीला मासिकात फक्त श्रीसाईबाबांच्या बद्दलचेच लिखाण असावे इतर विवाह वगैरे मजकूर नसावा.

श्रीसाईचरित्र हा एक बहुमोल ग्रंथ आहे. त्यात श्रीबाबांच्या मुखातून जे बहुमोल अमोल असे बोल आले आहेत त्यात काही खट्याळ पणाचे तर काही तत्वज्ञानाचेही आहेत. ते जर साई लीलेत सोप्या भाषेत प्रसिद्ध झाले तर त्या अमोल ग्रंथाचे कार्य वाढेल व सामान्य माणसालाही ते समजेल. असे सांगितले.

१४) श्री. **रमेश डी. चव्हाण नवापूर यांनी** सातव्या लेखक-कवि स्नेह-संमेलना निमित्त प्रसिद्ध करण्यात आलेल्या फेब्रुवारी १९८२ च्या काव्यबहार अंकात उत्कृष्ट कविता कविंच्या फोटो परिचयासह देऊन श्रीसाईलीलाच्या इतिहासात एकमेव अत्यंत चांगला अंक काढल्याबद्दल संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांचे मनःपूर्वक अभिनंदन. अशाच स्वरुपाचा दिवाळी अनुभव विशेषांक प्रसिद्ध करण्यात यावा.

स्नेहसंमेलनात लेखक-कविनी मांडलेल्या काही योग्य सुचनांची दखल घेण्यात येऊन कार्यवाही सुद्धा होते. याबद्दलही मनपूर्वक धन्यवाद.

संमेलनास येणाऱ्या लेखक-कविनी बाबांना अभिषेक करावयाचा असतो अभिषेकासाठी सबंध सकाळपासून माध्यान्ह आरती पर्यंत ताटकळत रहावे लागत असल्याने संमेलनाचे एक सत्र वाया जाते तरी लेखक कविसाठी स्वतंत्र कुपनची सोय करून अभिषेकासाठी ठराविक वेळ देण्यात यावा.

सातव्या संमेलनात डॉ. गव्हाणकर यांनी अलीकडच्या साईलीलातील कविता बद्दल कवितेत उत्कृष्ट भावना नसतात बहुसंख्य कविता या अगदी टाकून देण्याच्या गटारगंगेत टाकण्याच्या लायकीच्या असतात असे म्हणून नवोदीत कवि विषयींचा संताप व्यक्त केला त्याबद्दल मला खेद होत आहे. कुणाच्या भावना दुखावतील असे शब्द न वापरता साईभक्तानी आपले विचार सौम्यशब्दात प्रकट करावेत.

साईबाबां विषयी काहीही विचारा हे प्रत्येक संमेलनाच्या वेळी विषय प्रकटनात असतो परंतु आजवर तो प्रत्यक्षात कधीच घेतला गेला नाही. जे कार्यक्रम शक्य असतील तेच यापुढे जाहीर करावेत.

श्रीसाईलीला मासीकाचे अंतर्बाह्य स्वरूप उत्कृष्ट सजावटीने मनोहारी वाटते मुखपृष्ठाचे आतील पहिल्यापानाचे डिझाईन तसेच सदराचे डिझाईन करणारे मुंबईचे साईभक्त श्री. मधुकरराव गणपतराव तळवडेकर यांची ओळख लेखक-कविना करून देऊन स्नेहसंमेलनात त्याचा सत्कार करण्यात यावा.

गेल्या दोन वर्षापासून श्रीसाईबाबा पुण्यतिथी विषेषांक हा ऑक्टोबर महिन्याचा अंक बालसाहित्य खास अंक म्हणून प्रसिद्ध केलेला अंक बालकांना प्रोत्साहन म्हणून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमास माझा विरोध नाही परंतु त्यातील बहुसंख्य बाल लेखक कवि मित्र ही नेहमी लिखाण करणाऱ्या लेखक कविंची मुल असून बहुदा मोठ्यांनीच लहानांच्या नावाने लिखाण केल्याचा संभ्रम होतो. शिवाय काही बालकवी चक्क इतरांच्या कविता स्वतःच्या नावाने पाठवितात. ऑक्टोबर १९८१ च्या अंकात एका बालकविने माझ्या एका कवितेतील सात–आठ ओळी घेऊन एक दोन स्वतःच्या ओळी लिहून कविता प्रसिद्ध झालेली आहे. यासूचना केल्या.

लेखक–कवींच्या सूचना व ठरावांचा कार्यक्रम चालू असतानाच साकोरीच्या श्रीउपासनी कन्याकुमारी आश्रमाचे एक व्यवस्थापक डॉ. शांताराम टिपणीस यांचे आगमन झाले व त्यांनी या संमेलनाकरिता आणलेला श्रीमाताजींचा शुभसंदेश सांगितला. ज्या ठिकाणी पुण्यकर्म चालू असते तिथे देवदेवता उपस्थित असतात. कल्याणला श्रीसाईबाबांच्या मंदिराचे काम चालू आहे तिथे होम हवन, मूर्तीची प्राणप्रतिष्ठा इ. कार्यक्रम आहेत आणि म्हणून निमंत्रणावरून श्रीमाताजी तिथे गेल्याअसल्या कारणाने त्या समारंभाला हजर राहू शकल्या नाहीत. परंतु असे जरी असले तरी तुमच्या या वार्षिक सोहळ्यास त्यांचे शुभ आशिष घेऊन मी आलो आहे असे ते म्हणाले. जीवनाची वाटचाल करताना अडचणी नाहिशा व्हाव्यात व मन:शांती मिळावी म्हणून आणि सद्वर्तनासाठी मार्गदर्शन व्हावे म्हणून आपण संत–गुरू यांची गाठभेट घेत असतो. संतसमागम व्हावा म्हणून श्री. चेंदवणकर यांनी जे पुस्तक लिहिले आहे त्याला श्री माताजींचा शुभ आशीर्वाद आहे असे ते याप्रसंगी म्हणाले. यानंतर श्री. काकरे यांचे नवविवाहित चिरंजीव डॉ. प्रकाश व सौ. सुधा यांचा अध्यक्षांचे शुभहस्ते श्रीफल व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

सायंकाळी ६ वा. लेखक-कवी मंडळींच्या सूचनांच्या ठरावांचा कार्यक्रम आटोपता घेण्यात आला सर्व मंडळी श्रींच्या धूपारतीला गेली आरतीनंतर एकत्रित असा सहप्रसाद भोजनाचा कार्यक्रम ७-३० वा. झाला. भोजन गृहात सुरुवातीचे दोन रांगा मंडळींच्यासाठी खास राखून ठेवण्यात आल्या होत्या. भोजनानंतर रात्री ८ ते १० ही वेळ कवी मंडळींच्या दरबारात हजेरी लावण्यासाठी खास राखून ठेवण्यात आली होती. त्यात अनेकांनी हजेरी लावली हा कार्यक्रम खूपच सुंदर व श्रवणीय झाला.

संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे सोमवार ता. १ फेब्रुवारी रोजी कार्यक्रम किंचित उशिरा म्हणजे १०-१५ वाजता सुरू झाला.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला गतवर्षातील दिवंगत श्री साईभक्तांना मिनिटभर उभे राहून श्रद्धांजली वहाण्यात आली.

सुरुवातीस इंदूरचे श्री. बापूसाहेब निरखे यांनी बालसाहित्य विशेषांकातील मुलांचे कौतुक करावे असे सांगितले. याच संदर्भात संपादकांनी त्यांनी पाठविलेल्या ५१ रु. च्या देणगीचा काय विनियोग करावा त्यासंबंधी विचारणा केली व त्यासंबंधी लौकरच योजना कळवितो असे ते म्हणाले.

**श्री. बिपिन स्वादिया व श्री. अनिल रसाळ** मुंबई यांनी श्री साईलीलेचा प्रचार, प्रसार होण्यासाठी संस्थानात ठिकठिकाणी बोर्ड लावावेत, मराठी साईलीलेचा दिवाळी अंक ज्याप्रमाणे भक्तांच्या श्री साईविषयक अनुभवांचा प्रसिद्ध होतो तसा अंक इंग्रजी-हिंदी आवृत्तीचा पण असावा अशी सूचना सादर केली. श्री. डी. आर. खडके सौ. लीला मराठे, श्री. रघुनाथराव जुन्नरकर, श्री. जुगलकिशोर पुरी, श्रीमती श्री शहाणे, सौ. अस्मिता दांडेकर, नागेश मोगलाईकर यांनी पण संमेलनात सूचना मांडल्या व संयोजकांचे आभार मानले.

यानंतर भक्तमंडळी श्रींच्या माध्यान्ह आरतीस गेली व प्रसाद ग्रहणानंतर अल्प विश्रांती घेऊन सर्वजण सेवाधामकडे दुपारी ठीक ३ वा. निघाली. कोर्टरिसिव्हरसाहेब श्री. काकरे यांनी आपले चिरंजीव डॉ. प्रकाश यांच्या शुभविवाह प्रित्यर्थ संमेलनातील लेखक-कवी भक्त मंडळींना चहापानासाठी मुद्दाम आमंत्रित केले होते. या प्रसंगी पटवारी यांचा शेर व श्री. देवपुरकर यांचे भाषण झाले. लेखक मंडळीतर्फे पाण्याचा स्टेनलेसचा जग कुंकवाची कुयरी, खण भेटीप्रित्यर्थ वधू-वरांना देण्यात आला. शेवटी एकमेकांनी नाव घेण्याचा गोड समारंभ झाला व सर्व मंडळी चारच्या सुमारास पुन्हा आपल्या संमेलन स्थानी आली.

आज १–२–८२ ला रथ सप्तमी असल्याने संस्थानतर्फे तिळगूळ समारंभ करण्यात आला. स्वतः काकरेजींनी प्रत्येकाला तिळाचा लाडू दिला.

या तिळगूळ समारंभानंतर अध्यक्षमहोदय श्री. नानासाहेब रासने यांचे भाषण झाले.

**नानासाहेब रासने यांचे भाषण** श्री सद्‌गुरु साईबाबांच्या आशीर्वादाने व कृपा प्रसादाने माझा जन्म झालेला असल्यामुळे बाबा म्हणजेच माझे सर्वस्व आहे. मी बाबांना माझ्या आयुष्याच्या अंतापर्यंत विसरणे शक्य नाही. साईबाबांचा सहवास मला सुमारे १८ वर्षे लाभला होता. त्यांच्या विषयींच्या अनुभवलेल्या सर्व खऱ्या गोष्टी मी तुम्हाला सांगतो.

साईबाबा सर्वांना तोंडी उपदेश करीत तो सहज बोलता बोलता. त्यांनी आपला धर्म सोडा असे कोणासही सांगितले नाही. उलट प्रत्येकाने आपआपला धर्म पाळावा तो सोडू नये असेच ते प्रत्येकाला सांगत असत. काही भोंदू लोक असे सांगतात की मी बाबांचा पट्टशिष्य आहे. परंतु हे लक्षात ठेवा की हे साफ खोटे आहे. बाबांनी आपली शिष्यपरंपरा मुळीच निर्माण केली नव्हती आणि त्यामुळेच त्यांच्या नंतर आता शिर्डी-वर कोणी आपला अधिकार सांगू शकणार नाही.

बाबांना मी अगदी जवळून दीर्घकाळपर्यंत पाहिलेले आहे. त्यांच्या डोळयात फार तेज होते. त्यांचे समग्र व्यक्तिमत्वच फार तेजस्वी होते. त्यांचे तेज कोणाला फारसे सहन होऊ शकत नसे म्हणून त्यांच्या समोर कोणी उभा राहू शकत नसे.

तुम्ही सर्वजण बाबांची भक्ति करा व त्यांच्या उपदेशाप्रमाणे वागा. म्हणजे बाबा तुमच्या मदतीला आल्याशिवाय रहाणार नाहीत व तुमच्या अडचणी दूर करून तुम्हाला सुखाचा व समृद्धीचा मार्ग दाखवितील. शिर्डीला पुष्कळ सरकारी अधिकारी मंत्री संत्री येऊन दर्शन घेऊन जातात पण त्यांची ही भेट केवळ औपचारिक असते. त्यांच्याजवळ गाड्या मोटारी असतात म्हणून ते जाता जाता शिर्डीला येऊन जातात इतकेच. ते खऱ्या भक्तीने शिर्डीला येत नाहीत–आणि म्हणून त्यांच्यावर बाबांची कृपाही होत नाही.

पुष्कळ लोक बाबांना नवस करतात व पुष्कळ गोष्टी त्यांच्याकडे मागतात; पण मी म्हणतो बाबा काय कोणाचे देणे थोडेच लागतात ? बाबांना काय पाहिजे आहे

ती म्हणजे त्यांच्यावर अढळ श्रद्धा आणि भक्ति ती भक्ति जे करतील त्यांना ते पावतात म्हणून आधी भक्ति करा म्हणजे तुमच्या भक्तीचे फळ तुम्हाला आपोआप मिळेल. आधी भक्ती आणि मग फळ. भक्तीचा लवलेश नाही आणि फळ मात्र पाहिजे. तुम्ही अशाप्रकारे बाबांना फसवू पहाता काय ?

बाबांचे एकनिष्ठ भक्त माझ्या चांगले परिचयाचे होते. काकासाहेब दीक्षित, साठे, श्यामा, बुट्टी, नवलकर, निमोणकर, गोपाळराव गुंड, दासगणु इत्यादी किती नांवे सांगावी तेवढी थोडीच आहेत. ह्या सर्व भक्तांची बाबांच्यावर नितांत श्रद्धा होती व त्यांना बाबा हेच परब्रह्म वाटत असे. बाबांनाही ह्या सर्व भक्तांबद्दल प्रेम वाटे व त्यांच्यावर त्यांची नेहमी कृपादृष्टी असे.

साईबाबा सर्वांकडे समदृष्टीने पहात हा गरीब, हा श्रीमंत, हा सुशिक्षीत, हा अशिक्षित अशाप्रकारचा भेद त्यांच्याकडे कधीच नव्हता त्यामुळे ते सर्वांना सारखीच वागणूक देत असत. जी गोष्ट पैशा अडक्याची तीच गोष्ट धर्माची. त्यांनी कोणाच्याही धर्माची कधीच चौकशी केली नाही. त्यांच्या दरबारात येण्याला कोणालाही मज्जाव नव्हता त्याचप्रमाणे त्यांच्या मनात कोणाबद्दलही उच्चनीच भाव नव्हता. ह्याच कारणामुळे ते सर्व धर्मीयांना सारखेपणाने वागवीत. आज सर्व धर्म समभाव वगैरे गोष्टी राजकारणी पुरुष आपल्या स्वार्थासाठी बोलत आहेत परंतु ही भाषा साईबाबांच्या तोंडून कितीतरी वर्षांपूर्वी आम्ही ऐकलेली आहे व त्यांच्या जवळ खराच सर्व धर्म समभाव होता.

'अल्ला मालिक' हे शब्द बाबांच्या तोंडी नेहमी असत. परंतु हा अल्ला कोण ह्याबद्दल लोकांना कुतूहल आहे. मी तुम्हाला सांगतो की हा अल्ला म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून 'अलककनिरंजन' होय, बाबा हे नाथपंथी योगी होते आणि म्हणून त्यांना नाथपंथीय अलकनिरंजन व इतर गुरू ह्यांच्या बद्दल त्याना प्रेम होते.

श्री साईबाबांच्या संस्थानचा कारभार पहाण्याकरिता जुन्या संस्थानच्या मंडळीना मीच सल्ला देत आलो आहे व सध्याच्या शासनाच्या सहकार्याने चालणाऱ्या मंडळीना कोर्टरिसिव्हर साहेबांनाही वेळोवेळी सल्ला देण्याचे महत्वाचे कार्य मी करीत आहे आणि हयात असेपर्यंत मी हे काम करीत रहाणार आहे असे भाषणाच्या शेवटी त्यांनी सांगितले श्री साईबाबा दयाळू व कृपाळू होते खरे पण ते म्हणजे जमदग्नी किंवा धारवाडी काटा आहे. श्री साईनाथ भक्तांवर कृपा करतात. त्यांचा अंगारा संकटांना भस्म करून टाकतो याचा अनुभव सर्वांनी घ्या. श्री नानानी टाळ्यांच्या

गजरात आपले भाषण संपविले. भाषण करताना त्यांचा आवाजात ठणठणीतपणा कायम होता. भाषण प्रसंगी या वयातही त्यांच्या करारी स्वभावाची साक्ष पटत होती.

श्री. रासने यांच्या भाषणानंतर श्री. काकरे साहेब यांनी समारोपाचे भाषण केले. हिंदी आवृत्ती बद्दल ते म्हणाले की कोर्टाच्या काही महत्वाच्या निकाला नंतर जे व्यवस्थापक येतील त्यांना मी आपले म्हणणे कळवीन. मी काय करीन याबद्दल आताच मला काही आश्वासन देता येत नाही. आमच्या मासिकात पद्य लेखन साहित्य भरपूर येते. गद्य लेखांचे प्रमाण कमी आहे. तेव्हा लेखक मंडळीनी गद्य लेखनाकडे जास्त लक्ष द्यावे असे ते म्हणाले.

श्री. काकरे साहेबांच्या भाषणानंतर अध्यक्ष सौ. व श्री. नानासाहेब रासने यांचा संस्थानतर्फे शाल व श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला. लेखक कवी मंडळीं तर्फेही त्या उभयतांचा बहुमान करण्यात आला. श्री. काकरे, संपादक डॉ. परचुरे व चेंदवणकर यांचाही लेखक-कवी मंडळीतर्फे सत्कार करण्यात आला. कृपाशू प्रकाशनाचे श्री. विजय हजारे यांनी पत्रलेखनात आशियाई विक्रम करणाऱ्या साईभक्त श्री. रमाकांत पंडित यांना २५ रु. चे पाकीट देऊन सत्कार केला. चर्तुभुज झाल्याबद्दल श्री. व सौ. जगदीश देवपूरकर यांचाही सत्कार करण्यात आला.

यानंतर डॉ. परचुरे यांचे लेखक–कवींच्या ठराव सूचनांना उत्तरे देणारे भाषण झाले. संस्थानचे ऑफिस सुपरिंटेंडेंट श्री. द. चिं. पाठकसाहेब यांचेही आभार प्रदर्शनाचे भाषण झाले. पुरुष लेखक–कवींचे तर्फे प्रा. र. श्री. पुजारी व नागेश मोगलाईकर यांनी आभार मानले तर महिला वर्गातर्फे डॉ. सौ. सुमती खानविल्कर यांनी आभार मानले.

सर्व लेखक–कवींचा संस्थानतर्फे पुष्पहार श्रीफल, बाबांचा प्रसाद एक अभंग पुस्तिका व बाबांचे एक सुंदर कॅलेंडर देऊन सत्कार करण्यात आला. बाबांचे कॅलेंडर दिल्लीचे साईभक्त व तेथील श्रीसाई मंदिराचे चालक श्री. आर एस. चिटणीस यांनी भेटी दाखल पाठविली होती.

सायंकाळी ७ वा. हा ८ व्या संमेलनाचा कार्यक्रम समाप्त झाला. लगेच भक्तांना प्रसाद पंगतीस एकत्रच बसविण्यात आले. त्यानंतर दरबारात मंडळींनी हजेरी रात्री १० वाजेपर्यंत लावली, व शेजारती नंतर संपूर्ण कार्यक्रम संपले.

# संतश्रेष्ठ श्री काकामहाराज पुराणिक धोपेश्वर

—श्री. मधुसूदन वामन करंबेळकर
रघुनाथ निवास चेंबूर गांवठाण
मुंबई नं. ४०००७१

● श्री क्षेत्र धोपेश्वर हे राजापूरचे (जि. रत्नागिरी) पासून २ मैलावर आहे. तेथे स्वयंभू शंकराचे स्थान आहे. राजापूरची गंगा धोपेश्वरला वाहील्यास काशीची गंगा रामेश्वरला वाहील्याचे पुण्य मिळते. ह्या अशा पवित्र क्षेत्री श्री. रघुनाथ विश्वंभर उर्फ काकामहाराज पुराणिक ह्या संताचा जन्म झाला. ३२ वर्षे बीरवाडी सातारा येथे श्री संभाजी महाराज उनेकर व रावसाहेब कोल्हटकर या गुरुंची सेवा करून ते रामरुप बनले. अक्कलकोटचे स्वामी व आळंदीचे नृसिंह सरस्वती महाराज यांनी आपले भक्त धोपेश्वरला पाठवून गुप्त स्वरुपात वावरणारे 'काकामहाराज' प्रत्यक्ष मारुती आहे हे इतर जनात प्रगट केले व ते प्रसिद्धीस आले. श्री साईमहाराज भक्तांना 'काकामहाराज' दिसले व 'काकामहाराज' श्री साईनाथ दिसले अशी उदाहरणे आहेत.

श्री. दाभोळकरकृत श्री साईसच्चरित ह्या ग्रंथात अध्याय ११ पान १३३ पहा. श्री साईबाबांचे पूजेला गंध वर्ज होते, परंतु काकामहाराज यांचा शिष्य शिर्डीला गेला असता त्याला श्री साईमहाराज, काकामहाराज दिसले व त्याने काहीही विकल्प न धरता साईंना गंध लावले. श्रीसाई महाराज यांनीही मी त्यांचेजवळ बसलो व माझे गुह्य स्वरुप प्रगट झाले असा कबुली जबाब दिला. श्री काकामहाराज यांचे चरित्रातही श्री साई महाराजांचा उल्लेख बऱ्याच ठिकाणी आहे. आजही ते भक्तांना हाक मारतच पावतात असा अनुभव आहे. धोपेश्वरला त्यांची समाधी आहे. फाल्गुन वद्य १, २, ३ असा तीन दिवस पादुकोत्सव होतो. कार्तिक शु. १ व कार्तिक वद्य १३ पुण्यतिथी व जयंती असे उत्सव होतात. श्री साईमहाराजांना जाऊन ६४ वर्षे झाली व श्री काका महाराजांना जाऊन ७१ वर्षे झाली. दोघानाही एकमेकांबद्दल फार प्रेम होते. सर्व संत एकरुप आहेत हेच ह्यावरून सिद्ध होते. जय साईनाथ जय रघुनाथ.

# गावाकडच्या कविता

[ कवी–जगदीश देवपूरकर, प्रकाशिका सौ. यशोदा सोनार, चेतश्री प्रकाशन देशमुख चाळ, अमळनेर, पृष्ठे ७६ किंमत १२ रु. ]

धुळ्याचे प्रसिद्ध पत्रकार व कार्यकर्ते श्री. जगदीश देवपूरकर यांनी लिहिलेला हा ५८ कवितांचा संग्रह आहे. भुसावळ या तापीकाठच्या गावी ते वीज मंडळात नोकरीसाठी असताना एक वर्षभर राहिले आणि त्यांना आपल्या गावच्या आठवणी येऊ लागल्या व त्या आठवणी काव्यरूपाने कागदावर उतरल्या. या कवितांचाच हा संग्रह त्यांनी पुस्तक रूपाने प्रकाशित केला आहे. यातील साऱ्याच कविता वाचनीय असून यातील काव्याची काही रेखाटने व मुखपृष्ठ श्री. धनंजय गोवर्धने यांनी रेखाटली आहेत. कवी जगदीश यांचे हातून अशाच प्रकारची साहित्य सेवा घडो अशी शुभेच्छा.


## श्रीसाईलीला

### श्रीरामनवमी विशेषांक

श्रीसाईलीला मासिकाचा ६१ व्या वर्षाचा पहिला अंक श्रीसाईबाबांच्या श्रीरामनवमी उत्सव प्रसंगी १ एप्रिल १९८२ रोजी शिरडी येथे श्री. अनंतरावजी आठवले यांचे शुभहस्ते प्रकाशित होत आहे. पृष्ठे ६४ किंमत १ रु. मुखपृष्ठावर श्रीबाबांचे मनोहर चित्र विविध संग्राह्य मजकुराने भरलेला हा अंक आपल्याकडें ठेवाच.

## आठ लक्ष शब्द व सव्वा मैल लांबीचे पत्र

## नवा आशियाई विक्रम

श्री. रमाकांत पंडित साईदासानंद मुंबई यांनी श्री साईबाबांना आठ लाख शब्द असलेले सव्वा मैल लांबीचे एक पत्र लिहून पत्र लेखनात नवीन आशियाई विक्रम प्रस्थापित केला आहे. १५ ऑगस्ट १९८० या स्वातंत्र्यदिनी पत्र लिहिण्यास सुरवात करून एक वर्षात हे पत्र त्यांनी पुरे केले. सदर पत्रात ६८ धार्मिक पुस्तकांचा समावेश आहे हे या पत्राचे आणखी एक वैशिष्ट्य. श्री. रमाकांत पंडित यांचे वय ६८ वर्षांचे असून या वयातही वर्षभर रोज सुमारे ३ ते ४ तास त्यांनी लेखन केले.

# शिरडीतील श्रीरामनवमी उत्सव

* सर्व साईभक्तांना कळविण्यात येते की यंदा शिरडी येथे श्रीरामनवमी महोत्सव गुरुवार दिनांक १ एप्रिल ते शनिवार ता. ३ एप्रिल १९८२ पर्यंत नेहमी प्रमाणे थाटाने साजरा केला जाईल. सर्व साईभक्तांनी हेच निमंत्रण समजून महोत्सवास हजर राहून संस्थानात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वतोपरीने सहकार्य द्यावे अशी विनंती श्री. क. हि. काकरे कोर्टरिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी हे करतात. उत्सवात नेहमी प्रमाणे श्री. अनंतराव आठवले महाराज यांची कीर्तन-प्रवचने होणार असून अनेक गायक-भक्त-मंडळी आपापली हजेरी लावणार आहेत.

## मुंबईतील श्रीरामनवमी

* संस्थानच्या 'साईनिकेतन' या डॉ. आंबेडकर मार्ग दादर येथल्या कार्यालयातही शुक्रवार दिनांक २ एप्रिल १९८२ रोजी रामनवमी उत्सव साजरा केला जाईल व दुपारी ठीक १२ वा. आरती व प्रसादाचा कार्यक्रम होईल. ततपूर्वी भजन-प्रवचन कार्यक्रम होतील.

# साईबाबा हेच डॉक्टर!

**सौ. प्रतिभा ल. शर्मा**
राजाभाऊ पटवर्धन, दादर मुं. २८

● हल्लीचाच एक अनुभव. माझ्या भाच्याची त्याच्या शाळेतून मेडीकल तपासणी झाली. त्यात ऑपरेशन करण्याचे ठरले. फॅमिली डॉक्टरनीसुद्धा ऑपरेशनविषयी सांगितले. घरातले सर्व घाबरून गेले. ऑपरेशनची तारीख ठरली. त्या अगोदर त्याची आई आमच्याकडे आली होती. माझे काका साईभक्त आहेत. त्यांनी माझ्या चुलत बहिणीला सांगितले की, 'बाबांना सांग की ऑपरेशन टळू दे व अॅडमीट करण्यापूर्वी साईबाबांना नमस्कार करून, उदी लावून जा.' त्याप्रमाणे केल्यावर हॉस्पिटलमध्ये असे सांगण्यात आले की, ऑपरेशनची आवश्यकता नाही. खरेच साईबाबांनी हाक ऐकली व ऑपरेशन टळले.


|| ॐ श्रीसाई ||

जना द्यावे उत्तमोत्तम सुविचारी । हेची श्रीसाई संतोऽऽष मानी मुंबईत बृहन्मुंबईत । उपनगरांत । नव्या मुंबईत कोठेही ५०० ग्रॅम्स उत्तमोत्तम, डायरेक्ट मळ्यातील चहा फक्त रु. ११/- ला सर्व साईभक्तांस ह्या साईभक्ताकडून घरपोच अनमोल सुसेवा कॉफी सुद्धा.

बाहेरगावी देखील कोठेही पोस्टाने पाठवितो. त्याकरिता आगाऊ रु. १५/- पाठवावे ... लिहा / भेटा.

## पाटणे चहा व कॉफी

पोस्ट बॉक्स ६४९० नवरोजी बिल्डिंग
जागृती हौसिंग सोसायटी इस्टेट, लेडी जमशेटजी रोड,
माटुंगा (प. रेल्वे) मुंबई नं. ४०००१६.
टेलीफोन : ४६२३५९ सेल्स-ऑफीस / ५७१९९१ (निवास)
ता. क. शनि / रवि / रजेचे दिवशी बंद.
टाईम : ११-३० ते ८-३०

# साईपरिवार वृत्त विशेष

## रंजना-विष्णू शुभमंगल

● श्रीसाईलीलाचे कवी श्री राधाकृष्ण गुप्ता यांची कन्या चि. सौ. कां. रंजना हिचा शुभविवाह श्री लक्ष्मण ओंकार यांचे चिरंजीव श्री. विष्णू यांचे बरोबर मंगळवार दि. १६-२-८२ रोजी सायं. पाटकर वाडा, भगतसिंग रोड डोंबिवली येथे थाटाने पार पडला. वधू-वरांना अभिष्टचिंतन.

× × ×

श्री साईलीलाचे लेखक श्री. बिपीन खादिया यांचे चिरंजीव कुमार विनीत व कुमार गौरव यांचे व्रतबंध समारंभ गुरुवार दिनांक २५ फेब्रुवारी १९८२ रोजी मालाड येथील त्यांच्या ३०७ वी कमलकुंज दत्तमंदिर रोड येथील निवासस्थानी पार पडले. उभय बटूंना आमचे शुभाशिष.

## सौ. गोदावरीबाई चव्हाण साईचरणी विलीन

'श्री साईलीला' मासिकाचे लेखक-कवि व धुळे जिल्हा कवि मंडळाचे अध्यक्ष नवापूरचे साईभक्त श्री रमेश डी. चव्हाण यांच्या मातोश्री कै. सौ. गोदावरीबाई धर्माशेठ चव्हाण यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी दि. १९-१२-८१ रोजी 'साईनिकेतन' नवापूर येथे वृद्धापकाळामुळे दुःखद निधन झाले.

त्या साईबाबांच्या निष्ठावंत भक्त होत्या. सत्याला अनुसरून प्रामाणिकपणे वागून आपल्या आतिथ्यशील व प्रेमळ स्वभावामुळे त्या सर्वज्ञात होत्या.

श्री साईबाबा मृताच्या आत्म्यास सद्गती व चिरशांती देवोत.

# सुदृढ बालक स्पर्धा

श्रीसाईनाथ रुग्णालयामध्ये श्रीसाईबाबा संस्थानच्या वतीने या महिन्यात सुदृढ बालक स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. १ वर्षाच्या आतील बालकांचा एक गट व १ ते ३ वर्षे वयांच्या बालकांचा एक गट स्पर्धेकरिता आयोजित करण्यात आला होता. दि. ४–१२–८१, ११–१२–८१ व दि. १७–१२–८१ रोजी बालकांची मोफत तपासणी बालरोग तज्ञ डॉ. जे. एस. पटेल, डॉ. कोते, डॉ. तूपे इ. डॉक्टर्स कडून करण्यात आली. स्पर्धेसाठी अंदाजे ३२२ बालके आली होती. सर्व बालकांची तपासणी करून मोफत औषधे वाटण्यात आली.

दि. १७–१२–८१ रोजी स्पर्धेचा निकाल जाहिर करण्यात येऊन यशस्वी बालकांना खेळणी व खाऊ वाटण्यात आला. या स्पर्धेचे संयोजन संस्थानचे निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रबोध जोशी व त्यांच्या सहकार्यांनी यशस्वीरित्या केले. सुदृढ बालक स्पर्धेची ही कल्पना तशी नवीन असूनही तिला भरघोस प्रतिसाद मिळाला व लोकांनी तिचे भरपूर कौतुक केले.

★

# तीन थेंब

[ कवी–श्री. ग. दे. कुलकर्णी, प्रकाशिका–सौ. उषा कुलकर्णी, कुलदीप, तांबरी, उस्मानाबाद किंमत ५ रु. पृष्ठे ५४ ]

श्री साईलीलाचे एक कवी श्री. ग. दे. कुलकर्णी यांच्या ५९ कवितांचा संग्रह नुकताच प्रसिद्ध झाला असून त्यामधील प्रत्येक कविता ही खरोखरीच वाचनीय अशी आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने या त्यांच्या काव्य साहित्यास लेखन शैली, नाविन्य, गुणवत्ता इ. निकस लावून अनुदान योग्य ठरविले आहे यातच या पुस्तकाचे वैशिष्ट्य दिसून येते. श्री. कुलकर्णी यांच्या या काव्य साहित्यास आमच्या शुभेच्छा.

✱

# शिरडी-वृत्त माहे डिसेंबर सन १९८१

या महिन्यात नाताळाचे सुट्टीमुळे श्री साईनाथांचे दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी फार होती. शाळांच्या, कॉलेजच्या, कारखान्यांच्या सहली बऱ्याच प्रमाणात होत्या.

काही कलाकारांनी श्रींचे पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :-

**कीर्तन :** १) एकादशी व महत्वाचे दिवशी संस्थानतर्फे कीर्तने झाली.
२) ह. भ. प. सदाशिव बुवा पुराणिक, आळंदी.
३) ह. भ. प. कु. हेमलता पु. केळकर पुणे.
४) ह. भ. प. रामराव महाराज व सौ. सीताबाई रामराव बुळ ठाण

**प्रवचन :** ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे शिर्डी.

**भजन गायन, वादन वगैरे :** १) मधूबाला चावला, मुंबई. २) सीता टिपनीस, मुंबई. ३) श्री. आनंदराव कृष्णा कोराने, ४) श्री. बाळासाहेब पोतदार, ५) श्री. सुरेश मालंडकर, ६) श्री. शिवाजी द. पाटील, ७) नारायण पाटील, ८) श्री. पोपटराव वाघ, ९) श्री. महीपतराव पांडे, १०) श्री. श्यामराव राऊत, ११) श्री. संभाजी पांडे, १२) श्री. बाबासाहेब बसूगाडे, १३) श्री. पांडुरंग बसूगडे, १४) श्री. हरीदास राऊत, १५) श्री. शिवाजी भोसले, १६) श्री. अनंतराव थोरात, १७) श्री. मनसुब मुछा, १८) श्री. दिलीप करान, १९) श्री. अनिल कोराने, २०) श्री. सुहास ठोंबरे, २१) श्री. रमेश पाटील, २२) श्री. मेहताजी इंगळे, २३) श्री. एन. बी. कराडे, २४) श्री. रामचंद्र पवार, २५) श्री. प्रकाश जाधव, २६) श्री. किसन कोतेकर, २७) श्री. राजेंद्र कांबळे, २८) श्री. मन्सूर शेख, २९) श्री. शिवाजी इंगळे, ३०) श्री. विश्वनाथ कोराने, ३१) श्री. बाळासाहेब राऊत, ३२) श्री. उमेश शिंदे, ३३) श्री. वेताळ तालीम दत्तपंथी भजनी मंडळ, कोल्हापूर. ३४) ह. भ. प. श्री. ओम गुरु-कृपा भजनी मंडळ, खार. ३५) श्री. तान्हाजी खांडेकर, ठाणा. ३६) कु. छाया पु. केळकर, पुणे. ३७) श्रीमती कमल पु. केळकर, पुणे. ३८) श्री. यशवंत काशिनाथ नाईक, मुंबई. ३९) श्री. दत्ताराम भागोजी कदम, मुंबई. ४०) श्री. सुरेश सदाशिव हिरलेकर, मुंबई. ४१) श्री. विजय बळवंत मोरे, ४२) श्री. हरीभाऊ रामभाऊ वारगे, मुंबई. ४३) श्री. सुहास धाकू पवार, मुंबई. ४४) श्री. शिवनाथ सूर्यकांत विलनकर, मुंबई. ४५) श्री. सुधीर रामचंद्र गुडे, मुंबई. ४६) श्री. वसंत बाळाराम जोशी, मुंबई. ४७) श्री. विलास यशवंत पावस्कर, मुंबई. ४८) श्री. शशिकांत दळवी,

मुंबई. ४९) श्री. विलास महाडीक, मुंबई. ५०) श्री. बारकू शेठ, मुंबई. ५१) श्री. राजन सातघरे, मुंबई. ५२) श्री. अभय मुंबई. ५३) सुनिता गणेश केळकर, ५४) श्री. साईप्रसाद केळकर, ५५) शकुंतला मुजूमदार, सांगली. ५६) युनियनपार्क महिला मंडळ, मुंबई. ५७) श्री. गंगाधर विश्वनाथ संत, बडोदा. ५८) श्री. विजयकांत गंगाधर संत, बडोदा. ५९) श्री. हीरामन कोंडराम घटे, वरखेड. ६०) श्री. विजय पी. ठोमरे, वसई. ६१) श्री. आप्पा सामंत, मुंबई. ६२) शिर्डी साईबाबा सोसायटी भजनी मंडळ, हैद्राबाद. ६३) श्री. जयवंत कुलकर्णी, मुंबई. ६४) श्री. अनंत पांचाळ, मुंबई. ६५) श्री. मनोहर धडसे, ६६) श्री. उमानंद बोगम, मुंबई. ६७) मास्टर के. टी. टिकू, मुंबई. ६८) श्रीमती जयश्री टिकू, मुंबई. ६९) आसावरी वायकूळ, मुंबई. ७०) गुरुदत्त संगीत विद्यालय, मुंबई. ७१) श्री. गिरीश भीमराव सबनीस, मुंबई.

**श्री दत्तजयंती :** गुरुवार दि. १०-१२-८१ रोजी सालाबादप्रमाणे समाधी-मंदिरात श्री दत्तजयंती कार्यक्रम झाला. यंदा दत्तजयंती गुरुवारी आल्यामुळे भक्तांची दर्शनासाठी खुपच गर्दी होती. दत्तजन्म कीर्तन ह. भ. प. श्री. सदाशिव बुवा पुराणिक आळंदीकर यानी केले. रात्री विद्युत रोषणाईने सुशोभित रथाची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

**भव्य नेत्रदान शिबीर :** श्री साईबाबा संस्थान शिरडी लायन्स क्लब मुंबई, व रॉयल कॉमनवेल्थ सोसायटी फॉर दि ब्लाईंड. यानी शिरडी येथे नेत्रदान शिबीर आयोजीत केले होते. दि. २७-१२-८१ ते ३-१-८२ पर्यंत ८ दिवस शिबीर चालू होते. मुंबई येथील नामांकित डॉक्टर्सनी रुग्णांच्या डोळयातील मोतीबिंदूवर ४७१ शस्त्रक्रिया केल्या. शस्त्रक्रिया करवून घेणाऱ्या रुग्णांची व त्यांच्याबरोबर असलेल्या मदतनीसांची राहण्याची, जेवणाची तसेच वेळीच औषधोपचाराची उत्तम व्यवस्था ठेवण्यात आली होती. दि. ३-१-८२ रोजी निरोप समारंभ होऊन ह्या यशस्वी उपक्रमाची सांगता झाली. प्रत्येक रुग्णास औषधे व चष्मे मोफत देण्यात आले.

**हवा पाणी :** शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पहाटे हवेत थोडा गारवा असतो.

# काकरे–फटाले शुभमंगल

१५

श्री साईबाबा संस्थानचे कोर्टरिसिव्हर श्री. क. हि. काकरेसाहेब यांचे ज्येष्ठ पुत्र डॉ. प्रकाश, एम. बी. बी. एस. यांचा शुभविवाह औरंगाबादचे प्रसिद्ध कार्यकर्ते व पत्रकार श्री. नागनाथराव फटाले यांची सुकन्या चि. डॉ. सुधा, एम. बी. बी. एस. इजबरोबर शनिवार ता. ३० जानेवारी १९८२ रोजी सकाळी ९-३० वा. शिरडी येथील मंगल कार्यालयात साजरा करण्यात आला, या मंगलप्रसंगी वधूवरांना शुभाशिष देण्यासाठी मुंबई, पुणे, नाशिक, नगर धुळे, औरंगाबाद इ. विविध ठिकाणाहून विविध क्षेत्रातील नामांकीत मंडळी हजर होती. विवाह प्रसंगी शुभाशिषपर मंगलाष्टके धुळयाचे प्रसिद्ध कार्यकर्ते श्री. नागेशराव मोगलाईकर यांनी केली होती व ती त्यांनी म्हटली. उभयता डॉक्टर पतीपत्नींनी आपले उर्वरित सेवामय जीवन अनाथ, अपंग व दीन दु:खित रुग्णाईतांची सेवा करण्यात घालवावे अशी शुभेच्छा सर्वांनी व्यक्त केली.

★

**श्रीसाईलीला वाचकांनो**

## शुभकामनापर संदेश पाठवा


श्रीसाईबाबा संस्थान शिरडीतर्फे प्रकाशित होणाऱ्या श्रीसाईलीला या अध्यात्मिक मराठी आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या मासिकाला यंदा साठ वर्षे पूर्ण होऊन ते ६१ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. मोठ्या योगायोगाची गोष्ट अशी की, एकसष्ठाव्या वर्षाचा पहिला अंक श्रीसाईबाबांनी सुरू केलेल्या श्रीरामनवमी उत्सवाच्या दिवशी म्हणजे १ एप्रिल १९८२ रोजी शिर्डी येथे ह. भ. प. दासगणू महाराजांचे मानसपुत्र श्री. अनंतरावजी आठवले यांचे शुभहस्ते प्रकाशित करीत आहोत.

आपण श्रीसाईलीलेचे वाचक आहांत तेव्हा श्रीबाबांच्या या मासिकाला आपला शुभकामनापर संदेश त्वरेने पाठवून दिल्यास त्याची दखल घेऊन या खास अंकात त्याची कदाचित नोंदही केली जाईल. तुमचा संदेश उशिरात उशिरा म्हणजे १५ मार्च १९८२ पर्यंत आमच्या हाती यावाच.

**संदेश पाठविण्याचा पत्ता–**

**संपादक श्रीसाईलीला, साईनिकेतन**

८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुं. ४०००१४




पुढील रांग—डॉ. बाबाजी, श्री. काकरेसाहेब, श्री. नानासाहेब, श्री. चितांबर, मागील रांग—सर्वश्री फाटकसाहेब, प्रो. इ. भारद्वाज, डॉ. परचुरेसाहेब, श्री. इनामदारसाहेब, व सदानंद चेंदवणकर, पाठीमागे उभे संस्थान कर्मचारी श्री. शिदोढकर.



कोर्ट रिसिव्हर श्री. काकरेसाहेब समारोपाचे भाषण करताना.कोचावर श्री. सौ. रासने.



श्री. नानासाहेब रासने अध्यक्षीय भाषण करताना.



श्री साईबाबा संस्थानचे कोर्ट रिसिव्हर श्री. काकरेसाहेब यांनी अध्यक्ष श्री. नाना-साहेबांचा शाल व श्रीफल देऊन सत्कार करताना –

## संत चूडामणी भगवान श्री साईबाबा

[ लेखक–सदानंद चेंदवणकर, प्रकाशक–श्री. आनंद साने अंजली पब्लिशिंग हाऊस, पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणे ३० किंमत ३० रु. पृष्टे २६०]

# कादंबरीइतकेच हृद्य चरित्र

संतचरित्राच्या लेखनाची आणि त्या नंतरच्या त्याच्या प्रकाशनाची पूर्ती संत-कृपेशिवाय होत नाही. प्रस्तुतचे चरित्र हा लेखकाच्या प्रदीर्घ संतसेवेचे सुमधुर फळ असून आजवरच्या लेखनाचा कळस होय.

संतांकडे पाहाण्याचा भक्तलेखकांचा दृष्टिकोन पूर्णतः प्रेमभक्तीचाच असतो. तरीही भिन्न भिन्न लेखकांच्या भिन्न भिन्न व्यक्तिविशेषांमुळे चरित्राच्या मांडणीत फरक आढळतो. कोणी त्यातील भक्तकृपेस महत्व देतो, कोणी त्यातील सामाजिक आशय पाहातो, तर कोणी अध्यात्मिक मार्गदर्शनास प्राधान्य देतो. प्रस्तुत चरित्रात या तिहीं-वर सारखाच भर देण्यात आला आहे.

अधिकृत माहिती आणि काटेकोर मांडणी चरित्रास प्राणभूत समजली जाते. यामुळे चरित्राचे यथातथ्यत्व अबाधित राहाते. प्रस्तुत चरित्रात चरित्राच्या सामुग्रीची छाननी, निवड आढळते. चरित्राची रूपरेषा आधी आखून ज्ञात माहितीचा उपयोग साक्षेपीपणे केलेला दिसतो. त्यामुळे श्री साईचरित्राची गूढता उकलण्यासही मदत होते.

भक्तलेकरांना अव्याहत घडवीत राहाणे हे श्री साईचरित्राचे मर्म आहे. हे सूत्र हाती ठेवून, त्या जुन्या काळाचे भान ठेवून लेखकाने मोठ्या कौशल्याने चरित्र मांडले आहे. ललीतशैलीचा समर्थपणे मधून मधून उपयोग केल्यामुळे हे चरित्र कादं-बरी इतकेच हृद्य झाले आहे.

श्री साईदरबारातील भक्तांची ठळक दखल, श्री साईसच्चरिताचा आधार, श्री साई संप्रदायाचे महत्व या गोष्टींमुळे ग्रंथास भरगच्चपणाही आला आहे.

लेखकाची भाषाशैली सुबोध, सुटसुटीत असल्यामुळे आणि प्रकरणेही लहान लहान असल्यामुळे ग्रंथाची वाचनीयता वाढली आहे. संतचरित्र हे चित्तशुद्धीचे एक साधन असल्यामुळे हा ग्रंथ घरोघरी पोचल्यास त्याच्या श्रवणामुळे भक्तांना सात्त्विक आनंदाचा लाभ निश्चितपणे होईल, यात संशय नाही.

**—र. श्री. पुजारी**, पुणे ३०

# आवो साई

(श्री बाबांच्यावर काव्य रचण्यात हातखंडा, गेली कित्येक वर्षे साईलीलेतून गद्य व काव्य लेखन.)

सोनियाचा दिवस उगवला
पूर्व दिशा हंसली
नवरंगाने प्रभात फुलली
आली गगनावर लाली
उगवला शिलधीचा भाग्य रवि
सुटला वायुमंद सुगंध
वृक्ष वेलींनी भरला रंग
पक्षी गाती मंगल गीत
आली वनदेवी हंसत
करण्या परब्रह्माचे स्वागत
वाजत गाजत शिरडीनगरी
आली लग्न वरात
वऱ्हाड संगे सामोरी होता
बाल फकीर हंसत
आला भक्त सखा धावत
खंडोबाचा भगत पुजारी
दिसता तेजोमय फकीराची स्वारी
पाहूनी वंदीला 'आवो साई'
प्रगटला साईचा अवतार
शांता गाते साईनामाचा जयजयकार

—सौ. शांता अंबाजीराव सरोदे
उल्हेगल बिल्डींग, न. चिं. केळकर मार्ग, दादर २८

# शिरडीनगरी

[ सौ. कमल सांडभोर-साईभक्त, व भारुडकलावंत श्री. रघुनाथ सांडभोर यांच्या पत्नी. अनेक वर्षापासून काव्य लेखन, बाबांवर एवढी भक्ती की काही खाण्यास पुढे ठेवा, प्रथम ते पदार्थ बाबांसमोर ठेवतात व मगच स्वतः भक्षण करतात. ]

धन्य धन्य ती शिरडी नगरी
धन्य धन्य ती द्वारकामाई
धन्य धन्य तो महिमा उदीचा ॥
उदी लाविता कपाळी
सर्व पाप ताप जाई जळूनी ॥
जेथे लागले चरण साईंचे
धन्य धन्य तेथील नारी नर ॥
जिथे साईने फिरता फिरता
पाय राबविले स्वतःचे ॥
पाच घरे भिक्षा मागुनी
स्वतः राहुनी उपवाशी
दिन दुबळ्याची भूक भागवी
कमल विनवी साई बाबांना
अशी साई भक्ताची मनोकामना पूर्ण करा

—सौ. कमल रघुनाथ सांडभोर
५७० दत्तवाडी, साईसदन पुणे ३०

# देव जिंका प्राणमोले

(हे श्री बाबांच्यावर अतिशय हळूवार व भारावलेल्या अंतःकरणाने काव्य वाचन व काव्य निर्मिती करतात, पुण्यातील मुलांचे भावे स्कूलमध्ये ठसठशीत व्यक्तीमत्वाचे विद्यार्थीप्रीय शिक्षक.)

देह नव्हे आत्मा ज्यासी पूर्ण ज्ञान झाले
तया हृदी श्रीभगवंत रहावया आले ध्रु०
साधुसंत क्षेत्रे होती संतबोल हिरे-मोती
संतसमागमी सौख्य सर्व सामावले ! १
संतदृष्टि कृपामेघ लोटतात अमृतौघ
प्रपंचात परमार्थाचे पीक भरा आले ! २
मुक्त हस्ते देती दान तृप्त होत थोर सान
'नामधन लुटा लुटा' देव जिंका प्राणमोले ! ३

—श्री. श्रीराम आठवले, एम. ए. बी. एड.
बलवंत सदन, ३४४ नवीपेठ, पुणे ३०

☆

## साईभक्त श्री मधुसूदन पुरंदरे यांचे निधन

हेमराज वाडी, ठाकूरद्वार येथील एक साईभक्त, श्री मधुसूदन आनंदराव पुरंदरे हे शनिवार दि. २४ ऑक्टोबर १९८१ रोजी वयाच्या ८१ व्या वर्षी साईचरणी विलीन झाले. कै. पुरंदरे यांनी बाबांना प्रत्यक्ष अनेकदा पाहिले होते. त्यांचे मागे पत्नी व तीन मुली, जावई नातवंडे असा परिवार आहे,

ईश्वर मृतात्म्यास सद्‌गति देवो.

# साई दर्शन

शिरडीस जावूनि मन माझं गहीवरलं ।
साईनाथास बघुनि मन तृप्त झालं ।
किती भव्य आणि पवित्र असे गाभारा ।
जागृत कृपावन्त समाधि इथे बाबांची
साई चरणी ठेविता मस्तक ।
अंग शहारूनी दावीले निज रुप तुझे ।
नजरा नजर होता मन बोले आत ।
नाही ऊणे भासणार आता जीवनात ।
उठवेनासि वाटे मज रावूळातूनि ।
टाकला हा देह ओवाळुनि ।
दिली आज स्फूर्ती-साईनाथ देवा ।
भक्त गण आम्ही असे तुझाच ठेवा ।
तुजविन मजला आता कोणी नाही ।
अशीच सेवा घडुदे तुझेच पायी ।

—श्री. **नारायण तांबे**
कॅम्प्रिहॅन्स वागळे इस्टेट ठाणे ४

# श्री साई चिंतन

मनात साई, नयनी साई, साई हृदयात
भजनी साई, पूजनी साई, साई शिरडीत ॥ धृ. ॥

वंदन करूया साईला
प्रेमळ अपुल्या आईला
पिता समजुनी साईला
नमन करूया सद्‌गुरुला
भूपाळीतूनी भूप आळविता साई गीतात ॥ १ ॥

किती ग नटवू साईला
सुंदर माझ्या माऊलीला
दीपात साई ज्योत ही साई
चराचराला उजळूनी राही
धुपारतीला धूप जाळीता साई सुगंधात ॥ २ ॥

नका ग विसरू साईला
तसेच द्वारकामाईला
चला चला ग शिरडीला
वसुंधरेच्या स्वर्गाला
शेजारतीला शेज सजविता साई समाधीत ॥ ३ ॥

—सौ. विजया व. देसाई
२/१४, जयकर स्मृती,
आरे रोड, गोरेगाव मुं. ६२

# आठविता रूप साईचे

आठविता रूप साई होतो जीवाचा आकांत
स्वामी तू जगाचा पाहू नको आता अंत ॥ धृ. ॥

तहानेले डोळे नाथा मूर्ति तुझी न्याहाळया
तू माय म्हणवीशी ही वेळ का रे रूसावया ?
तुझ्या लेकुराचा प्राण आता येई रे कंठात ॥ १ ॥

स्वामी तू जगाचा पाहू नको आता अंत
जन्मोजन्मी थांबलो माझ्या जीवाच्या जीवलगा
या जन्माचे व्हावं सोनं माझ्या श्रीनाथा श्रीरंगा
भेटीलागी बाबा किती चालू रे अविश्रांत ॥ २ ॥

स्वामी तू जगाचा पाहू नको आता अंत
माध्यान्हीचा सूर्य आता पश्चिमेस जाई
माझी बाग फुलवाया तूज सवड कशी नाही ?
तू राजांचा राजा म्हणती संतांचा संत ॥ ३ ॥

स्वामी तू जगाचा पाहू नको आता अंत
मज खंत ना खेद तुझ्या मायावी जगाची
शेवटची आंस माझी मी वीट तुझ्या पायाची
पैल्तीरा नेई धरूनी या लंगड्याचा हात ॥ ४ ॥

स्वामी तू जगाचा पाहू नको आता अंत

—श्री. यशवंत महादेव चव्हाण
६२८८/२४३, पंतनगर (गुलमोहर)
घाटकोपर, मुंबई—४०००७५

# प्रभु साईनाथा घे धाव आता

(बाबांची कविता)

प्रभुसाईनाथा, घे धाव आता,
लागे ओढ चित्ता, तुझी रे अनंता ॥ धृ० ॥

तुझी आस आम्हा असे दिनानाथा,
तुझ्याविण त्राता दुजा कोण आता
दयाळा, कृपाळा, नमो विश्वनाथा ॥ १ ॥

साईरुप घेऊन शिरडीसी आला,
चिंध्यांचा झोला स्वये चालविला,
पाण्याने पणत्या लिले पेटविता ॥ २ ॥

चमत्कार नाना जना दाखविले,
दुःखीतांचे दुःख त्वरे दूर केले
हरावे तिमीरा, झणी सौख्यदाता ॥ ३ ॥

पदी लीन झालो आम्ही सान बाला,
कृपादृष्टी ठेवून तारा सकलां
नमस्कार घ्यावा, आमुचा समर्था ॥ ४ ॥

—कु. यमुना माळवदे
१६०, दादासाहेब फाळके रोड, दादर मुं. १४

# शिरडी दर्शन घेऊ या!

('या बाळानो, या रे या!' ची क्षमा मागून)

या भक्तांनो, या रे या!
शिर्डी दर्शन घेऊ या!
चला चला रे, चला चला!
साई दर्शना चला चला!
भगवा ध्वज हाती
घेऊनी चला
साई शिर्डीच्या
वाटेने चला
भजनाचा स्वर ऐकू या!
या भक्तांनो, या रे या! ॥ १ ॥

आरति एक सुरात होती
आवाज ही चहूबाजू घुमती
भक्तीप्रेम ही जागृत होती
साईसंत पुलकित होती
भक्तीभावाने
भक्त ही गाती
प्रसाद घेती
मन निर्मळ होती
संकटं आपुली टाळू या!
या भक्तांनो, या रे या! ॥ २ ॥

— श्री. ग. शां. बडगुजर
मोगलाई, भाटे चाळ
धुळे ४२४००१

# भूपाळी

( चाल : आनंद कंद ऐसा )

चल उठ साईनाथा का झोपला मुरारी
उदयास भानु आला तू सृष्टीचा चितारी ॥ धृ० ॥

कमले जलांत फुलली पाण्यास संथ लहरी
किलबील पाखरांची मधु गोड ऐक गाणी
धेनु सवत्स धावे चरण्यास जाओ राणी
धारोष्ण दुध आवडे भरली तुझी ही झारी ॥ १ ॥

अंकावरी तुलाही घेऊनी हिंद माता
राजीव नेत्र पुसते जी खेळवी अनंता
भाग्यास पार नाही अवधूत निर्वीकारी
सोडूनी वैभवाते का मारली भरारी ॥ २ ॥

कमरेस लावी लुंगी कफनीही घाली अंगी
तव पायी या खडावा डोईस एक चिंधी
लीला अनंत तुझ्या बघता मनास भारी
शिरडीस पातला का होऊनी तू भिकारी ॥ ३ ॥

तू संत शिरडीचा किर्ती फुले जगात
तव मुर्तीचे पुजारी दिसती घराघरात
करिती अनन्य भक्ती ठेऊनी भाव भोळा
ये धाव पाव साई दे भेट एक वेळा ॥ ४ ॥

—श्रीमती रुक्मिणी बेंद्रे
सेंट्रल बँकेजळ, राहुरी
जि. अहमदनगर

# सर्व साक्षी साई

अग्नि देवतेला साक्षी ठेवूनी
मी पुजिते साई देवा
स्वामी पदारे नित्य मी नमिते
दत्त प्रभु प्रगटे साई रूपाने ॥ १ ॥

सर्व श्रेष्ठ तव नामी प्रिती
सहजपणे होई तव प्राती
जीवन हाच नव्हे का राम ॥ २ ॥

जोवरी गाठी धन संपत्ती
तोवरी भोवती सखे सोबती
धन सरता अन् दुःख संकटी
एकच तू आधार साई देवा ॥ ३ ॥

पुजावे की तिर्थी पहावे
मनात उमजे कोठे जावे
मनी कर्म योग निष्काम ॥ ४ ॥

—सौ. रशमी रमेश कोरे
एल. जे. रोड, काद्री वाडी
बैठा बंगला, खो. नं. ५
माहीम मुं. नं. ४०००१६

# • घोषणा •

श्री साईलीला मासिकाच्या मालकीबद्दल व अन्य तपशीलाबद्दल दर वर्षी फेब्रुवारी नंतरच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध करावयाची घोषणा.

| | |
|---|---|
| १. प्रकाशनाचे स्थळ– | साई निकेतन<br>८०४–बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर,<br>मुंबई–४०० ०१४. |
| २. प्रकाशनाचा कालावधी– | मासिक. |
| ३. मुद्रकाचे नाव– | श्री. पांडुरंग दाजिबा मोरे |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| पत्ता– | बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स, वडाळा,<br>मुंबई–४०० ०३१. |
| ४. प्रकाशकाचे नाव– | श्री. क. हि. काकरे |
| राष्ट्रीयत्व– | भारतीय |
| पत्ता– | साई निकेतन<br>८०४–बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर,<br>मुंबई–४०० ०१४. |
| ५. संपादकाचे नाव– | श्री. क. हि. काकरे |
| राष्ट्रीयत्व– | भारतीय |
| पत्ता– | साई निकेतन,<br>८०४–बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर,<br>मुंबई–४०० ०१४. |
| ६. हे पत्र ज्यांच्या मालकीचे आहे त्यांचे व १ टक्क्याहून अधिक भांडवल धारण करणारे भाग-धारक किंवा भागीदार यांची नावे व पत्ते. | श्री साईबाबा संस्थान, शिरडी<br>(धार्मिक व चॅरिटेबल संस्था) |

मी, श्री. क. हि. काकरे यानुसार असे घोषित करतो की वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

**क. हि. काकरे**
**(प्रकाशकाची सही)**
**रिसीव्हर**

# अभंग

भक्तीची पद्धत। मला नसे ज्ञात
तेला विना वात। जळतसे

पुजेसाठी जसा। जाळीती कापूर
तसा मी आतुर। तुझ्यासाठी

धुपदीप जळे। सदैव मंदिरी
अंतरीचे वैरी। भस्म व्हावे

फोडीती श्रीफळ। फुलांचे ते हार
नको हा प्रकार। भक्तीसाठी

सुवासिक तेले। घालीती आंघोळ
मला पाय धूळ। श्रेष्ठ तुझी

तुझ्यासम मानू। सर्व जाती एक
मनामध्ये नेक। श्रद्धा ठेवू

तुझ्या विना साई। मला नको काही
दर्शनाची घाई। लागली रे

**–श्री. शिवाजी कौ. मोरे**
मु. पो. दोंडाईचा ( स्टेशन भाग )
ता. शिंदखेडा, जि. धुळे